

म. ग्रं. सं. ठाणे
चरित्र
८३३

परांजपे

REFBK-0007944

६४२

ला.

१५१२३
२५।११।५३

ला ७४३

नऊ नाथ : १

********************

१५७३३
२५।११।५३

# मच्छिन्द्रनाथ

५३३

लेखक
भा. श्री. परांजपे, एम्. ए.
भोंसला मिलिटरी स्कूल, नाशिक सिटी

७९६५

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

REFBK-0007944

मूल्य बारा आणे

# प्र स्ता व ना

आपला देश, आपली संस्कृति ह्यांची ओळख पटवून देणें हें शिक्षण-शास्त्राचें एक महत्त्वाचें अंग आहे. स्वत्वाची जाणीव झाल्याशिवाय कर्तव्य कोणतें, तें तरी कसें ओळखतां येणार? ह्या दृष्टीनें युरोप-अमेरिकेंत जुन्या कथांचें संस्करण व संवर्धन चालू आहे. छोटींमोठीं राष्ट्रें आपल्या जुन्या कथा जतन करतात, नव्हे अभिमानानें मिरवतात. वाडवडिलांपासून परंपरेनें चालत आलेल्या ह्या कथा म्हणजे राष्ट्राची संपत्ति होय असें ते मानतात आणि त्यांचा हा समज खोटा नाहीं. दुर्दैव इतकेंच कीं हिंदुस्थानांत ही गोष्ट फार उशीरा कळत आहे. कोणत्याही इतर राष्ट्रापेक्षां जुन्या कथावाङ्मयाच्या दृष्टीनें संपन्न असूनही त्याचा उपयोग शिशुशिक्षणाकडे कसा करून घ्यावा हें आम्हांला पाश्चात्यांच्या संसर्गानें कळून आलें. पण आमच्यांतल्या आयाबायांनीं आणि हरिदासपुराणिकांनीं मात्र तेल घालून दिव्याची वात थोडीथोडी पुढें सारीत जावी तसें हें वाङ्मय खालच्या लोकांत वाचून दाखवून त्यांची ह्या जुन्या कथावाङ्मयाविषयींची आवड जागृत ठेवली. त्याचें एक प्रत्यंतर म्हणजे श्रीधर-महीपति ह्यांच्या पोथ्या. ह्या पोथ्यांना जेवढा वाचकवर्ग मिळतो तेवढा आज घटकेलाही मराठींत ललितवाङ्मयाच्या इतर शाखांत कमीच आढळेल. लो. टिळकांनीं महाभारताची जी प्रशंसा केली होती ती केवळ त्यांतील सुभाषितांसाठीं नव्हे, तर नेहमीं लोकरंजनाच्या दृष्टीनें वेधक ठरलेल्या त्यांतील अद्भुत व आदर्श कथांसाठीं. जी गोष्ट ह्या महाभारताची वा भागवताची तीच मराठींतील पोथ्यांची वा संतचरित्रांची.

हीं मराठींतील संतचरित्रें ऐतिहासिक गोष्टी ह्या दृष्टीनें लक्षांत घेण्यासारखीं आहेत. पण लिहिणाऱ्यांनीं तीं श्रीमद्भागवतासारख्या लोकप्रिय पुराणग्रंथाच्या धाटणीवर लिहिलीं व त्यामुळें त्यांत अद्भुतता जास्त आणि ऐतिहासिक सत्य कमी असा प्रकार झाला आहे. पुराणांचा आदर्श समोर ठेवल्यामुळें ह्या चरित्रपर वृत्तान्तांतही अत्युक्तिपूर्ण वर्णनें, चमत्कारांचें भारूड, देवतांचीं आगमनें व वेळोवेळीं पृथ्वीवरील त्यांचें अवतरण, सिद्धीचे चमत्कारिक प्रताप आणि देवतावादाची जागा घेणारा अवतारवाद हीं जागोजागीं दिसतात व त्यांच्या कचाट्यांत त्या त्या चरित्रविषयक सत्पुरुषांच्या जीवनांतील महत्त्वाचे कथाभाग लोपून गेले आहेत.

१५९३३
२८८११५३

नवनाथकथासार ह्या नांवाचा एक ग्रंथ मालुकवीनें मराठींत लिहिलेला आढळतो. नाथपरंपरा ही एक प्रभावी परंपरा होऊन गेली असावी असें ऐतिहासिक दृष्ट्या वाटतें. पण तें पटविण्यासारखें एकही प्रत्यंतर प्रस्तुत ग्रंथांत आढळत नाहीं. त्यामुळें बुद्धीचें समाधान तर होत नाहींच, पण सुसंगततेच्या अभावीं अद्भुतांत रमणाऱ्या बालहृदयाचें तरी समाधान होईल कीं नाहीं ह्याची शंका वाटते. अशा स्थितींत बालवाचकांना अशा ग्रंथाची ओळख करून देण्यापेक्षां नाथपरंपरेची ओळख पटवून देतां येईल आणि त्यांच्या रंजनप्रिय मनाचेंही समाधान होईल अशा तऱ्हेनें साऱ्याच कथा नव्या रूपानें लिहून काढण्याचा प्रयत्न केला आहे. मूळ ग्रंथांतील कांहीं कथाभाग आधाराला घेतला आहे. अत्युक्तिपूर्ण व पुनरुक्तिपूर्ण असा भाग गाळला आहे. एकंदरींत नाथपरंपरेची थोडी फार ओळख पटेल, निदान त्याविषयींची चिकित्सा वाढेल, अशा पद्धतीनें बालवाचकांसाठीं ह्या कथा लिहावयाच्या असल्यामुळें त्यांत अद्भुततेची छटा कायम ठेवली आहे. युरोपांतील ग्रीक देवतांच्या, ऑर्थरसारख्या पराक्रमी पुरुषांच्या किंवा मिशनरी साधुसंतांच्या कथांभोंवतीं अद्भुततेचें वलय जसें शोभा देतें तद्वतच ह्या योगेश्वर नाथपुरुषांचीं अचाट व अद्भुत कर्मं त्यांच्या चरित्रवृत्तान्ताला शोभादायक ठरलीं आहेत. योगाभ्यासी म्हणून गाजलेल्या नाथपंथाच्या प्रवर्तकांना तीं साजेशीं आहेत, हें कोणालाही कबूल करावें लागेल.

नाथपंथाचा प्रसार करणारे जे सिद्ध पुरुष होऊन गेले त्यांत नऊ नाथ प्रमुख होत. ह्यांनाच नऊ योगेश्वर अशी संज्ञा आहे. ह्या नऊ प्रमुख प्रवर्तकांत मच्छिन्द्रनाथ पहिले होत. गोड वाणी, प्रेमळ वर्तन आणि लोककल्याणाची तळमळ हे त्यांच्या ठिकाणचे प्रमुख गुण होते अशी नाथपंथी साक्ष देतात. त्याच्याच आधारानें ह्या गोष्टी लिहिल्या आहेत. ह्या श्रेष्ठ गुणांचा ठसा ह्या गोष्टींतून थोडा तरी उमटला असेल अशी मी आशा करतों. नऊ नाथांपैकीं मच्छिन्द्र, रेवण व नागनाथ ह्या तीन सिद्ध पुरुषांचा निर्देश ह्या कथांत आला असला तरी प्रामुख्यानें मच्छिन्द्रनाथांचें जीवनचित्र उभें करतां यावें हाच लेखकाचा हेतु आहे. तो सिद्धीस गेल्यास आणि बालवाचकांना हा प्रयत्न आवडल्यास ह्याच पद्धतीनें गोरक्षनाथ व जालंदरनाथ ह्यांच्या गोष्टी क्रमाक्रमानें पुस्तकरूपानें पुढें येतील. ती संधि केव्हां येते तेंच पाहायचें.

भा. श्री. परांजपे

## पुन्हा एकदा

आठ वर्षांनंतरच्या दीर्घ अवधीनंतर पुन्हा एकदा ‘ मच्छिन्द्रनाथ ’ बालवाचकांच्या भेटीस येत आहेत.

नव्या आवृत्तीच्या निमित्तानें थोडासा बदल ह्या आवृत्तींत त्यांना आढळेल. तो हा कीं मच्छिन्द्रनाथांच्या गोष्टींशिवाय पहिल्या आवृत्तींत आलेल्या नागनाथ आणि रेवणनाथ’ह्यांच्या गोष्टी ह्यांतून गाळल्या आहेत व त्यांऐवजीं मच्छिन्द्र-नाथांच्याच गोष्टी दिल्या आहेत. पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें “मच्छिन्द्रनाथांचें जीवनचित्र प्रामुख्यानें उभें करावें हा हेतु” ह्या आवृत्तींत जास्त सुसंगत व नीटनेटक्या स्वरूपांत मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

नागनाथ आणि रेवणनाथ ह्या आवृत्तीपुरते ‘ अंतर्धान ’ पावले असले तरी त्याबद्दल बालवाचकांनीं निराश होण्याचें कारण नाहीं. योग्य वेळीं तेही मच्छिन्द्रनाथांप्रमाणेंच स्वतंत्रपणें आपल्या गोष्टी सांगायला पुढें येतील.

भा. श्री. परांजपे

## अ नु क्र म णि का


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. देवाचा लाडका | ... ५ | ५. राजाला शिक्षा | ... ३० |
| २. देवानें दिलेलें मूल | ... १२ | ६. चोर साव बनले | ... ३९ |
| ३. मच्छिन्द्र कुठें गेला ? | ... १८ | ७. जहाज वांचविलें | ... ५२ |
| ४. देवाची कृपा | ... २४ | ८. आईचा आशीर्वाद | ... ७१ |



सर्वाधिकार प्रकाशकाधीन



पहिली आवृत्ति : १९४४

दुसरी आवृत्ति : १९५३

मुद्रक : बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, कर्नाटक हाउस, चिराबाजार, मुंबई २

न ऊ ना थ : १

*****************

# मच्छिन्द्रनाथ

७८५४

१ ★ ★ देवाचा लाडका

यमुनेच्या कांठाकांठानें शंकर-पार्वती फिरत फिरत चाललीं होतीं. देवतांचें तें फिरणें. कधीं कुणाला समजायचें नाहीं, चाहूल लागायची नाहीं, पाऊल दिसायचें नाहीं, आले केव्हां आणि गेले केव्हां तें देखील कळायचें नाहीं. पण देवता दिसत नसल्या तरी त्यांच्या येण्याजाण्याच्या खुणा मात्र तुमच्या आमच्या दृष्टीला दिसूं शकतात. कारण देवता पृथ्वीवर येतात त्या आपल्याबरोबर सुखासमाधानाचें वारें घेऊन येतात. आनंदाचा प्रकाश आणतात. प्रसन्नतेचा वास सारीकडे पसरतो. सारीं झाडें आणि वेली हळुहळू डोलत त्यांना प्रणाम करतात. मंद वाहाणारा वारा जणूं त्यांच्या सेवेसाठीं सारखा त्यांच्या मागून पुढून धावत असतो. रस्त्यांतल्या अशुभ, अमंगळ वस्तु तो नाहींशा करतो आणि देवतांचा मार्ग उजळ आणि शुद्ध ठेवतो. पण देवता अशा सन्मानाच्या भोक्त्या असतात थोड्याच ! त्यांना स्वतःला सुख नको असतें. जग सुखांत आहे कीं नाहीं हें त्यांना पाहायचें असतें. सारी सृष्टि आनंदानें डोलत आहे,

हें त्यांना स्वतःच्या डोळ्यांनीं समजून घ्यायचें असतें. पृथ्वी, अग्नि, सूर्य, वारा हीं सारीं सृष्टीच्या कामासाठीं ठेवलेलीं नोकरमाणसें आपलीं कामें नीट करतात कीं नाहीं, वारा नीट वाहातो, ढग घेऊन येतो, पाणी जमिनीवर सोडतो, कीं तसाच पळून जातो? डोंगरांत पाण्याचे लोट वाहातात कीं नाहीं, नद्या नीट काम देतात कीं नाहीं, हें सारें त्यांना पाहायचें असतें. आग काय किंवा वारा काय, सृष्टीच्या कामासाठीं देवानें योजलेले नोकर. पण मालक दृष्टिआड झाले कीं नोकर अरेराव बनतात, स्वतः माजतात, वाटेल तसा धिंगाणा घालतात, हवी तशी सत्ता गाजवितात आणि ज्यांचीं त्यांनीं कामें करायचीं त्यांच्याच उरावर बसून त्यांचा छळ करायला ते मागेंपुढें पाहात नाहींत. तसें त्यांनीं करूं नये, म्हणून तर देवता अशा मुकाट्यानें पृथ्वीवर संचार करायला येत असतात.

पश्चिम दिशा गुलाल उधळीत होती. ढग तो पृथ्वीवर पसरीत होते. यमुनेचें पाणी रंग झेलीत होतें. दशदिशांना खालीं वर सारीकडे गुलाल पसरल्याचा भास होत होता. जणूं शंकरांच्या आगमनानें सुखी झालेली सृष्टि नवें सुंदर पातळ नेसली होती. पण शंकरांना त्याचें काय? ते ह्या गोष्टीचे भुकेले नव्हते. त्यांना स्वतःचें सुख नको होतें. सृष्टीचें पालन नीट होत आहे ना, कुठें द्वेषाचें बीज रुजत नाहीं ना, स्वार्थबुद्धि नाहीं ना? हें त्यांना हवें होतें.

आज भगवान् शंकर प्रसन्न दिसत होते. सृष्टि प्रसन्न दिसत होती, म्हणून का ते प्रसन्न होते? कीं आणखी दुसरा कोणता सुखदायक, आनंद देणारा देखावा त्यांना दिसला होता? पार्वतीमातेला विचारल्या-शिवाय राहवलें नाहीं. पार्वती म्हणाली, "देवा, आज कुणीकडे जायचं आहे? मघांपासून सारखं हिंडणं चाललं आहे. किती दूर आलों, पाहिलंत का? कैलास दूर राहिला, हिमालयाचा पायथा गेला, तडितापशांचीं अरण्यं गेलीं, गंगेचा घाट दिसेनासा झाला, तुमची आवडती वाराणसी-

सुद्धा बाजूला राहिली. तरी चालणं संपलं नाहीं ! असा कुणाचा शोध घेणं चाललं आहे ?"

शंकर हसले आणि म्हणाले, "थकले ना तुझे पाय ? वाटलं होतं, तुला घेऊन दूर दूर फिरायला जावं. पहाडाची पोर तूं. म्हटलं, थकायची नाहींस. असं हिंडणंफिरणं नको होतं तर कशाला ह्या जोग्याला माळ घातलीस ?"

"देवा, तुम्हांला जोगी कोण म्हणेल ? नांवाचा जोग पण त्रिभुवनाची काळजी. तुम्हांला सत्तेचा हव्यास काय कमी आहे ! इंद्रानें न् वरुणानें साऱ्यांनीं आज्ञा ऐकल्याच पाहिजेत. त्या आज्ञा कुणीं मोडूं म्हटलं तर कोण राग ! कोण जबर शिक्षा ! मदनाला कसं उभं जाळलं होतं, तें नाहीं मी विसरलें !!"

"पार्वती, सृष्टीनें आज्ञा पाळायची ती तरी तिच्या बऱ्यासाठींच. तेव्हां शिस्त ही चाललीच पाहिजे. वेळेवर डोळा वटारूनही पाहावं लागतं. तूंच नाहीं का बाळ गजाननाला कधीं रागावत ? पण तें तरी त्याच्या हितासाठीं ना ! बाकी तुला तरी हें कशाला सांगायचं ? स्वतः जगन्माता तूं. कधीं कधीं महिषासुरमर्दिनीचा अवतार धरतेस, पण नेहमींची अंबिका. तसंच माझं. मी कधीं रुद्र होतों; पण नेहमींचा 'शिव' आहें, म्हणून मला 'सदाशिव' म्हणतात. तूं 'जगन्मंगला' तसा मी 'सदाशिव.' पण शिस्तीकरतां रागवावं लागतं एवढंच."

"बाकी आजची वृत्ति नेहमींपेक्षां प्रसन्न दिसते. कुणाचा तरी शोध करणं चाललं आहे. ह्या यमुनेच्या कांठीं कसं मघांपासून घोटाळणं चाललं आहे."

"तुला यमुनेची शोभा पाहायची आहे ना ! तुला घेऊन कधीं फिरत नाहीं, नेहमीं बसून असतों म्हणून तुझी नेहमींची तक्रार. तेव्हां विचार केला कीं आज दूरवर फिरायला जावं. आज तुला खूप हिंडवणार ....."

" मग मला कुठें नको आहे ? पण तुमचं हिंडणं उगीच नसायचं. खरंच, देवा, तुम्ही त्रैलोक्याचे स्वामी, पण असे जोग्यासारखे वागतां. स्वतःची चिंता नाहीं, पण दुसऱ्याची चिंता रात्रंदिवस चाललेली. पाहिलं तर काम करण्याची कांहीं जरूरी नाहीं, पण सदा लगबग, सदा चिंता, सदा असं हिंडणं. विश्रांति कशी ती नाहींच. सूर्यचंद्र आज्ञेप्रमाणें फिरत आहेत, सारं कांहीं आज्ञेप्रमाणें सुरळीत चाललं आहे, मग अशी लगबग कां ? "

" पार्वती, जो जगाचा मालक, तोच जगाचा खरा सेवक. धन्याला स्वतः शेताची राखण करावी लागते, नजर ठेवावी लागते. मातेला अपत्याची काळजी घ्यावी लागते. त्यांना नुसतं वाढवायचं, घास घालायचा, मोठं करायचं एवढीच काळजी करून सरतं का ? वयाच्या बरोबरीनें त्यांनीं ज्ञान मिळवावं, मोठेपणा मिळवावा हेंही आई पाहाते ना ? तीच गोष्ट जगाची. जग नुसतं वाढावं असं म्हणून कसं चालेल ! तें सन्मार्गाला लागलं पाहिजे. माणसांचीं मनं मोठीं झालीं पाहिजेत. पण हें जग हवं तसं अद्याप सुधारत नाहीं. "

" प्रभु, मानव सुखासाठीं धडपड करतो तें वाईट आहे का ? साऱ्यांनीं जोग घ्यावा, स्मशानांत बसावं, विरक्त व्हावं, मग हें जग कसं चालेल ? "

" पार्वती, जग चाललं पाहिजे हें खरं. पण तें आहे तसंच राहून कसं चालेल ? माणसांनीं संसार न सोडला तरी चालेल, पण त्यांनीं एकमेकांशीं भांडूं नये, द्वेष करूं नये आणि स्वतःचं अकल्याण करून घेऊं नये. पण हें देखील त्यांना वेळोवेळीं सांगावं लागतं. आम्ही स्वतःला देव म्हणतों, म्हणवतों. पण आम्हांला त्यांच्यापर्यंत जाऊन पोचतां येत नाहीं. त्यांना हातानें बोट धरून नीट मार्गाला लावावं तें जुळत नाहीं. वेळोवेळीं सांगावं, सुधारावं एवढी फुरसत नाहीं. म्हणून आम्हांला वेळोवेळीं चांगल्या माणसांचा शोध घ्यावा लागतो. जो स्वतः सुधारून दुसऱ्यांना सुधारील असा माणूस आम्हांला नेहमीं हवा असतो. "

" अस्सं, आपलं हें काम साधुसंत करतात, म्हणूनच का ते आपले लाडके असतात? "

" होय. जगाच्या कल्याणाची माझी इच्छा जे पुरवितात, ते माझे जास्त लाडके असतात. आणि कां असूं नयेत? जे स्वार्थबुद्धि दूर ठेवतात, संकटं सोसतात, जगाची काळजी करतात ते मला जास्त आवडतात. तूंच सांग पार्वती, आईची माया जास्त कुणावर असते? जो स्वतःची काळजी करीत नाहीं त्याच्यावरच ना? मग जगाची काळजी जे करतात त्यांची काळजी मीं नाहीं करायची तर कुणीं करायची? "

" काय? जो स्वतःची काळजी करीत नाहीं त्याची काळजी प्रभु करतात? "

कुणीं बरें विचारलें हें? ही वाणी कुठून आली? कुणीं केला हा प्रश्न?

पार्वती इकडे तिकडे पाहूं लागली. शंकर हसले. आपलें बोलणें कुणीं ऐकलें तें त्यांना माहीत होतें. ते म्हणाले, " होय, बाळ! ज्याला स्वतःची काळजी नसते, त्याची काळजी मी करतों, त्याची चिंता मी बाळगतों. "

" तर मग मी प्रभूचा आवडता होण्याचा प्रयत्न करीन. "

भगवान् शंकर म्हणाले, " तथास्तु! "

पार्वतीनें शंकरांच्या तोंडाकडे पाहिलें आणि विचारलें, " देवा, हें तुम्ही कुणाशीं बोलत आहां? मला देखील दृष्टीस पडत नाहीं असं इथें कोण आहे? "

शंकर हसले आणि म्हणाले, " पार्वती, जरा अंतर्दृष्टि उघडून ह्या यमुनेच्या पाण्यांत पाहा. तो मोठा मासा दिसतो आहे ना? त्याच्या पोटांत काय आहे तें बघ! "

जगन्माता पार्वतीनें पाहिलें तों काय, माशाच्या पोटांत मूल!





जगन्माता पार्वतीनें पाहिलें तों काय, माशाच्या पोटांत मूल !

८५१३३ २८/१११५ ३

भगवान् म्हणाले, " पार्वती, हा मुलगा माशाच्या पोटांत आहे म्हणून दचकूं नकोस. थोर पुरुषांचा जन्म असा अडीअडचणींतच होतो. अशा नीच जातींतूनच ते उदयाला येतात. थोरपणा हा जन्मावर नाहीं. माणसानें केलेल्या कृतीवर आहे. हा मुलगा पुढें मच्छिंद्रनाथ नांवाचा एक मोठा योगी होईल आणि माझी इच्छा पुरी करील. आतां समजलं ना मी इथें कशासाठीं आलों तें ? "

जगन्माता हसली. तिनें शंकरांना भक्तिभावानें प्रणाम केला आणि म्हटलें, " प्रभु, कळलं. तुम्ही आज प्रसन्न कां होतां हें कळलं. तुमच्या-सारख्या श्रेष्ठ देवतेचा आनंद असाच सामान्य माणसाच्या आनंदाहून वेगळा असतो हेंच खरं. "

मग जगन्माता आणि भगवान् शंकर हसत हसत तेथून अंतर्धान पावलीं; पण सृष्टि अजूनही हसत होती, झाडें डोलत होतीं, वारा वाहात होता, नदी गाणें म्हणत होती. भगवान् शंकरांना झालेला आनंद जणुं दिशादिशांतून ओसंडत होता.



## २ ★ ★ देवानें दिलेला मुलगा

माशाच्या पोटांतलें तें मूल फार काळ तशा स्थितींत राहिलें नाहीं. लवकरच दोन दिवसांनीं एक कोळी आला आणि त्यानें यमुना नदींत जाळें टाकून मासे पकडले. त्यांत हा मोठा मासाही पकडला गेला. घरीं आणून पाहातो, तों पोटांत मूल आढळलें. त्याला मोठें आश्चर्य वाटलें. गुटगुटीत सुंदर आणि लोभसवाणें असें तें मूल! तें आपले इवलेसे हातपाय हालवूं लागलें, मिर्‌मिर् पाहूं लागलें आणि रडूं लागलें. कोळ्याला आणि त्याच्या बायकोला तें मूल पाहून आनंद झाला. विशेषत: बायकोचा आनंद तर गगनांत मावेना. तिला मूल नव्हतें. तिनें किती व्रतें केलीं, उपासतापास केले, वडा-पिंपळांना प्रदक्षिणा घातल्या, अतीतअभ्यागतांची पूजा केली, पण सारें व्यर्थ. देवाला तिची विनवणी जणुं ऐकायलाच गेली नव्हती. मुलाची तिला भारी हौस! लहान मुलाला खेळवावें, कडेवर घ्यावें, निजवावें, गाणीं गावीं आणि थोपटावें असें तिला फार वाटे. ती शेजारच्या लहान लहान मुलांना बोलावून घरीं आणी, त्यांना खेळ देई, खाऊ देई, तीं मागत तें सारें ती देई. पण तीं मुलें तरी कशीं लबाड! खेळ घेण्यापुरतीं तिच्या भोवतीं भोवतीं जमत आणि पक्ष्यांसारखीं चिंवचिंव करीत, पण खेळ मिळाला रे मिळाला कीं पळालीं घरीं. जसे दाणे वेंचून घरट्याकडे पळणारे पक्षीच! आणि मग पुन्हा तिला घर उदास आणि एकलकोंडें वाटे. आईकडे पळत जाणाऱ्या त्या मुलांकडे पाहून तिला फार वाईट वाटे. जाणूनबुजून दुसऱ्यांचीं मुलें, तीं किती वेळ जवळ राहाणार! हाक मारली कीं आपल्याकडे दुडदुड धावत येईल, कमरेला मिठी मारील, कुणी रागावलें तर पदराशीं झेप घेईल, आपण दिसलों नाहीं तर रडून आकान्त करील आणि आपल्याला पाहिल्याबरोबर हसूं लागेल असें मूल तिला हवें होतें. आपल्याला

'आई' म्हणून गोड हाक मारील असें स्वतःचें, सत्तेचें मूल तिला हवें होतें.

हें मूल पाहातांच तिला अतिशय आनंद झाला. तिनें त्याला जवळ घेतलें. तें मूलही तिला किती लवकर बिलगलें! जणुं देवानेंच तिची प्रार्थना ऐकून तिला हें मूल दिलें होतें. होय, हें मूल मी पाळणार, त्याला जवळ घेणार, दूध पाजणार, त्याच्यावर आपली सारी मायाममता सिंचन करणार. हें मूल मोठें झालें म्हणजे 'आई' म्हणून आपल्याला हाक मारील, आपल्याजवळ धावत येईल, आपल्या मांडीवर बसेल, आपल्या कुशींत निजेल, आपल्याला पाहून हसेल, आपल्या कमरेभोवतीं विळखा घालील, गोड गोड गोष्टी सांगेल, आपल्याला सोडून तें दुसरीकडे कुठें कधीं जाणार नाहीं, कुणीं बोलावलें तरी जाणार नाहीं, उलट कुणी रागावलें तर आपल्याकडे धावत येईल, आपल्याला मिठी मारील, त्याचे चिमणे बोल आपण ऐकूं, चिमणे खेळ पाहूं, असे किती तरी विचार त्या कोळ्याच्या बायकोच्या मनांत आले. तिनें तत्क्षणीं त्या मुलाला उचललें आणि पोटाशीं धरलें.

अशा रीतीनें तें मूल त्या कोळ्याच्या घरीं दिवसामासानें वाढूं लागलें. मोठें झालें. कोळ्याच्या बायकोला 'आई' म्हणूं लागलें. त्या कोळ्याच्या घरांत आतां आनंद खेळूं लागला आणि दिवसगतीनें वाढत गेला. ती कोळ्याची बायको नवऱ्याला, आजूबाजूच्या बायांना आपल्या मुलाबद्दल नव्या नव्या गोष्टी सांगूं लागली. आज काय, बाळ तिच्याकडे पाहून हसला, आज त्याला दांत आले, आज तो रांगूं लागला, आज बोलूं लागला, आज काय सोबत्यांकडे जाण्याचा हट्ट धरून बसला. अशा रोजच्या नव्या गोष्टी, नवें कौतुक. तीं दोघें नवराबायको त्या मुलाच्या भोवतीं भोवतीं असत. त्याला खेळ देत, खाऊ देत, त्याचे बोबडे बोल ऐकून आनंद मानीत, त्याच्या पायांत कांटा रुतला तर विव्हळ होत, कुठें दिसेनासा झाला, कीं घाबरीं होत. आपल्या ओठांतला घास काढून त्यांनीं

त्याला चारलें होतें. ममतेचें पांघरूण घालून त्यांनीं थंडीपाण्यापासून त्याला वांचविलें होतें. तो मुलगाही खरोखर किती सुंदर! साऱ्या कोळ्यांच्या वस्तींत इतका सुंदर आणि सुदृढ मुलगा नव्हता. दृष्ट लागेल म्हणून आई नेहमीं कावरीबावरी होत असे. दिसायला गोरापान आणि कसा छान छान. त्याची आई त्याला 'मच्छिन्द्र' म्हणे. मच्छिन्द्रानें त्या घरांतच नव्हे, तर साऱ्या कोळीवाड्यांत आनंदाची लयलूट मांडली होती.

पण ही आनंदाची लयलूट साऱ्यांनाच कुठें मानवते? कित्येक माणसें अशीं असतात कीं त्यांना कुणाला आनंद झालेला पाहावत नाहीं. जणुं दुसऱ्याला सुख झालें, तर तें त्यांच्या हृदयाला कांट्यासारखें बोचतें. त्यांच्या मुद्रेवर प्रसन्नता म्हणाल, तर कधीं दिसायची नाहीं. ओठांवर कधीं हसूं उमटायचें नाहीं. कधीं गोड बोलणें नाहीं. चेहेऱ्यावर सदा आंठ्या. दुसऱ्याला त्रास व्हावा, जग दुःखाच्या डोहांत बुडावें ही ह्यांची मोठी इच्छा. अमृताच्या पेल्यांत विषाचा थेंब टाकतील आणि सारें अमृत नासून टाकतील. त्या विषाचा अंमल कुणावर होऊन त्याचे डोळे पांढरे व्हायची वेळ आली तरी ह्यांना आनंदच! अर्थात् हा आनंद जगाला दुःख दिल्याशिवाय कसा मिळणार?

त्या कोळ्यांच्या वस्तींत अशी एक बाई होती. साठी उलटलेली, सारें अंग कांपत आहे, पाय लटलट करताहेत, डोळ्यांनीं दिसत नाहीं, अशी विद्रुप, जरखड म्हातारी बाई होती. साऱ्या हातांपायांवर शिरा उमटलेल्या. चारचौघी जमल्या आणि बोलूं लागल्या म्हणजे तिला राहावत नसे. काठी टेकीत, कुंथत कुंथत तेथें जावें, अचावचा बोलावें, कुणाला टोचेल असे टोमणे द्यावे, वर्मे काढावीं, भांडण लावतां येईल तर पाहावें, एका घरांतली गोष्ट दुसरीकडे सांगत सुटावी अशा अभद्र वृत्तीची बाई ती. कुणाचें चांगलें म्हणून तिला खपत नसे. बायकांना तरी काय, असें बोलघेवडें, भांडकुदळ माणूस मिळालें तर हवेंच असतें. साऱ्या जगाची चौकशी करायची हा कांहीं बायकांचा स्वभावच.

अमकीच्या घरांत काय आहे, तमकी काय बोलली, अमकीचा नवरा रुसून गेला, तमकी आपल्या जावेशीं खूप भांडली अशा गोष्टी त्यांना ऐकायला आणि बोलायला फार आवडतात. असें सांगणारें आणि ऐकणारें माणूस एका ठिकाणीं आलें म्हणजे मग काय, जिभा फुटाण्यासारख्या फुटतात आणि कानांनाही मौज ऐकायला मिळते.

एक दिवस मच्छिन्द्र मुलांबरोबर खेळत होता. जवळच ही म्हातारी आणि चार कुटाळ बायका बसल्या होत्या उखाळ्यापाखाळ्या काढीत. इतक्यांत खेळांत भांडण झालें. मुलें हमरीतुमरीवर आलीं. मच्छिन्द्राला तें भांडण करणें आवडलें नाहीं. तो मुलांना म्हणाला, "तुम्ही असे भांडत असाल तर मी जातों आपल्या आईकडे." ते शब्द म्हातारीनें ऐकले. ती हसत हसत म्हणाली, "तुझी रे कुठली आई! तिनें का तुला जन्म दिलाय थोडाच!" मुलांनीं तें ऐकलें आणि झालें, मच्छिन्द्राला चिडवायला त्यांना निमित्त मिळालें. तीं सारीं त्याच्या पाठीमागें लागलीं आणि त्यांनीं त्याला चिडवून सळो कीं पळो केलें. मग मच्छिन्द्र तेथें कशाला थांबतो! तो घरीं आला, पण नेहमींप्रमाणें आईकडे रडत गेला नाहीं. एकीकडे अंधारांत बसून रडूं लागला.

त्याचें तें रडणें आईनें ऐकलें. ती मच्छिन्द्राजवळ आली आणि म्हणाली, "बाळ, कां रे असा रडतोस? खेळायला गेला नाहींस? मुलांशीं तुझं भांडण का झालं?"

मुलांनीं मच्छिन्द्राला चिडवलें त्याचा राग तर मच्छिन्द्राला आला होताच, पण त्याहून त्या म्हातारीच्या बोलण्याचें त्याला विशेष वाईट वाटत होतें. त्याला वाटलें, आतां आपल्याला आई नाहीं. आपण रडत रडत कुणाजवळ जायचें, कुणाच्या पदरांत लपायचें, 'आई' म्हणून कुणाला हाक मारायची? आतां आपले हट्ट कोण पुरवणार आणि आपल्याला जवळ कोण घेणार, आपले डोळे कोण पुसणार? त्यामुळें तो रडत होता.

आईला त्यानें उत्तर दिलें नाहीं. तिच्याकडे पाहिलेंसुद्धा नाहीं. तो आपला तसाच डोळे मिटून रडत बसला.

पण आईला का तें दुःख पाहावेल? त्याचें रडणें ती कसें ऐकून घेईल? आपल्या मुलानें आपल्याजवळ रडावें आणि आपल्याशीं बोलूं नये, आपल्या दुःखाचें कारण सांगूं नये ह्याचें आईला विशेष दुःख होत असतें. आपल्या मुलानें आपल्याजवळ हट्ट करावा, बिलगावें, काय हवें तें मागावें, तें सोडून तो नुसता रडत बसला, आपल्यासमोर डोळ्यांतून पाणी काढलें, हुंदके दिले आणि आपल्याशीं बोलला मात्र नाहीं त्याचेंच त्या आईला फार वाईट वाटलें. तिच्या मनांत त्याच्याबद्दल दुजाभाव होता कुठें? ती तर त्याला आपला मुलगा समजत होती. पोटच्या पोराप्रमाणें मानीत होती. प्रेम करीत होती. त्याला दुःख व्हावें हें तिला कसें आवडेल? ती त्याच्याजवळ गेली. तिनें त्याला ममतेनें जवळ घेतलें, कुरवाळलें, त्याच्या डोळ्यांतलें पाणी आपल्या हातानें पुसलें, त्याचें डोकें आपल्या मांडीवर घेतलें आणि त्याला गोड शब्दांनीं म्हटलें, "बाळ, बोलत कां नाहींस? रागावलास का माझ्यावर?"

ते गोड आणि ममतेचे शब्द! त्यांत राग नव्हता, रुसणें नव्हतें. नुसतें अपरंपार अमृत भरलेलें होतें. आई आधींच गोड बोलते. आज तर जणुं सारा ठेवणींतला गोडवा तिनें ह्या शब्दांत भरून त्याला वाढला होता. असले शब्द ऐकले म्हणजे सारा राग विरघळतो, रडणें थांबतें, रुसवा असेल तर तोही नाहींसा होतो. मच्छिन्द्रानें ते शब्द ऐकले आणि आईच्या गळ्याला विळखा घातला. खरेंच! ही त्याची आई होती. नुसती हाक मारण्यापुरती नव्हे; खरी आई. तिनें त्याला वाढविलें, त्याचे हट्ट पुरविले, त्याच्यावर ममता केली, त्याला जवळ घेतलें, अश्रु पुसले, समाधान केलें, गोड मायेचे शब्द बोलली. आई व्हायला आणखी काय करावें लागतें? तिनें त्याला जन्म दिला नव्हता, कबूल; पण सारें प्रेम तर तिनें त्यालाच देऊन टाकलें होतें ना!

 १५७३३-१७
२८८९७१५३

मग मच्छिन्द्राला राहवलें नाहीं. त्यानें आईला सारी हकीकत सांगितली. तो म्हणाला, "आई, मला मुलांच्या चिडवण्याचा नाहीं राग आला, पण त्या दुष्ट म्हातारीनें म्हटलं कीं 'मी कांहीं तुझा मुलगा नव्हे'. म्हणून मला फार वाईट वाटलं. खरंच का तूं माझी आई नाहींस? सांग ना."

असल्या प्रश्नाचें उत्तर कसें बरें द्यायचें? किती नाजूक प्रश्न! ह्या प्रश्नाचें उत्तर थोडक्यांत आणि चटकन् द्यायचें तरी कसें? पण तें उत्तर प्रेमाच्या माणसाला देतां येतें. अगदीं चटकन् देतां येतें. तेंच मच्छिन्द्राच्या आईनें दिलें. तिनें काय केलें असेल असें तुम्हांला वाटतें? तिनें त्याला असें सांगितलें काय, कीं 'हो, मी तुझी आई. खरी आई. आणि कुणीं जें कांहीं सांगितलं असेल तें सारं खोटं!' छे, असें बोलण्यांत कांहीं अर्थ नसतो. असल्या गोष्टी शब्दांनीं पटवितां येतातच असें नाहीं. खरेपणा पटविण्याची खरी रीत वेगळीच असते आणि ती प्रेमळ मनाला चांगली माहीत असते? मच्छिन्द्राच्या आईला ती रीत माहीत होती. तिनें मच्छिन्द्राला आपल्या पोटाशीं घट्ट धरलें आणि त्याचा एक गोड मुका घेतला.

पण तसा मुका घेतां घेतां ती एकदम रडूं लागली. मच्छिन्द्राला कळेना, आई अशी रडते कां? आईला रडतांना त्यानें कधीं पाहिलें नव्हतें. त्याला कसेंसेंच झालें. त्याचें मन गोंधळून गेलें. काय बोलावें तें त्याला सुचेना, समजेना. त्याला वाटलें, आपण प्रश्न केला म्हणून तर आई रडत नाहीं ना! छे, छे, ती आपली मोठी चूक झाली म्हणायची. म्हणून तो म्हणाला, "आई, रडूं नकोस ग अशी. तूं अशी रडलीस म्हणजे मला तें पाहवत नाहीं. तूंच माझी आई आहेस. मीं प्रश्न विचारला, ती माझी चूक झाली."

डोळ्यांतले अश्रु पुसत आईनें त्याच्याकडे पाहिलें आणि ती म्हणाली, "बाळ, कुणा चांडाळणीनें हें तुझ्या मनांत भरवलं? तिच्या जिभेला

किडे पडोत. आईच्या नि मुलाच्यामध्यें वितुष्ट पाडणाऱ्याला देव नेहमीं नरकांत पाडील. बाळ, तुला कसं सांगू ? तूं माझ्या पोटचा नाहींस, पण देवानें तुला माझ्या स्वाधीन केलं. तूं माझा आहेस. कृपा करून मला सोडून कुठें जाऊं नकोस. तूं हसलास म्हणजे मला आनंद. तूं रडलास तर मला दुःख. तुझ्या पलीकडे मला जग नाहीं. तूंच माझे डोळे. तूंच माझं जग. "

मच्छिन्द्र म्हणाला, " आई, तूं माझ्यावर रागावली नाहींस ना ? मग माझा मुका घे पाहूं. "

मग मच्छिन्द्राच्या आईनें त्याचा पुन्हा एकदा मुका घेतला. गोड गोड मुका घेतला.

## ३ ★ ★ मच्छिन्द्र कुठें गेला ?

तो प्रसंग होऊन पुष्कळ दिवस लोटले. मच्छिन्द्रानें आईला पुन्हा तसा प्रश्न कधीं विचारला नाहीं. त्या मायलेकांच्या प्रेमांत अंतर पडलें नाहीं. आईनें नेहमींप्रमाणें ' बाळ ' म्हणून हाक मारावी, मुलानें ' आई ' म्हणून ओ द्यावी असें चाललें होतें. आईनें मुलाला थोपटावें, जवळ घ्यावें, सारें अगदीं पूर्वीसारखें ! पण काय असेल तें असो, आईच्या प्रेमळ मनांत मधून मधून कसला तरी कांटा सलत असे. तिला वाटे, मच्छिन्द्र आपल्याला दुरावणार तर नाहीं ना ? तो आपल्यापासून दूर जाणार तर नाहीं ना ? आई आपल्या पिलाला फार जपते. पंखांखालीं घेते, त्याच्या चोंचींत चारा घालते ; पण सारें जग असें प्रेमळ असतें थोडेंच ? त्यांत पुन्हा आतां मच्छिन्द्राला ही गोष्ट कळली. ती त्याला कळली नसती तर किती बरें झालें असतें ! त्याच्या वागणुकींतला प्रेमळपणा अद्याप सरला नाहीं, पण एक प्रकारचा खोटा भाव मात्र उत्पन्न

झाला आहे. एक प्रकारचें अंतर आलें आहे. तो आतां पूर्वीप्रमाणें हट्ट करीत नाहीं, रुसत नाहीं, रागावत नाहीं, सांगितल्या शब्दाबाहेर जात नाहीं; पण ह्याला काय प्रेम म्हणायचें? छे, आईला मुलापासून वेगळीच अपेक्षा असते. तो सुखी असावा, स्वच्छंदानें खेळत असावा, त्यानें हट्ट करावा. पण मच्छिन्द्राकडे पाहावें, तर आतांशा त्याला समजूतदारपणा आलेला. तो आईवर प्रेम करी, तिच्या मनाप्रमाणें वागे, गोड गोड बोले, तिला त्रास पडूं देत नसे.


पण एक गोष्ट खरी होती. त्या दिवसापासून मच्छिन्द्राच्या वागणुकींत फरक पडला. तो आईवर जास्त प्रेम करूं लागला. तिची आज्ञा मोडीनासा झाला. हट्ट करीनासा झाला. चार चौघा मुलांत पूर्वीप्रमाणें मिसळेना, खेळायला जाईना, घरीं आईला मदत करी. आई म्हणे, 'जा तूं खेळायला.' तो म्हणे, 'मी तुला मदत करतों.' आई म्हणे, 'तुला खेळावंसं कां वाटत नाहीं? तुझं कुणाशीं भांडण झालं आहे का?' मच्छिन्द्र म्हणे, 'तुला सोडून जावंसं वाटत नाहीं.' मुलें येत आणि म्हणत, 'ये ना मच्छिन्द्र खेळायला.' मच्छिन्द्र म्हणे, 'नाहीं, मला फुरसत नाहीं. मी कामांत आहें.' आई म्हणे, 'कसलं काम आहे? जा तूं. मी करीन माझं काम.' मच्छिन्द्र म्हणे, 'तुझं काम म्हणजे माझंच काम.' आई जास्तच रागावली तर मच्छिन्द्र म्हणे, 'आई, तूं आतां थकत चाललीस. तुला नको का कुणी मदतीला?' आई म्हणे, 'मला नको कुणी मदतीला. मी आहें सबळ माझं काम करायला.'

मच्छिन्द्र जवळ असला तर आईला तें नको का होतें? तो तर तिच्या जिवाचा कलिजा. डोळ्यांतला प्राण. तो क्षणभर बाहेर गेला तर तिला करमत नसे. तो जवळ नसला तर तिला जेवण जात नसे. पूर्वी ती कामांत असली, तरी खेळत असलेल्या मच्छिन्द्राकडे तिचें लक्ष असे. पण हा मच्छिन्द्र पूर्वीसारखा राहिला होता कुठें? तो आतां धड खेळेना, ना बोलेना. आईच्याजवळ तो नेहमीं हसतमुख असे. पण त्याचें मन

पूर्वीसारखें आनंदी नव्हतें. वयाच्या मानानें त्याला जणुं एकाएकीं जास्त समजूत आली होती. आणि तेंच तर आईला पाहावत नव्हतें.

एक दिवस मच्छिन्द्र बापाला म्हणाला, 'बाबा, मी तुमच्याबरोबर आज नदीवर येऊं का ? मी तुम्हांला मदत करीन.' बाप हसून म्हणाला, 'तूं कसली मदत करणार ? त्यापेक्षां घरींच खेळ.' पण मच्छिन्द्र म्हणाला, 'नाहीं. मी तुम्हांला त्रास देणार नाहीं. मी तुमच्याबरोबर येईन. निमूटपणें बसेन. तुम्ही काय करतां तें पाहीन. मला नको का आतां काम करायला ?' आई हें बोलणें आंत ऐकत होती. 'कामाचं राहो म्हणा. पण येतों म्हणतो तर न्या त्याला. तो कांहीं तुम्हांला त्रास देणार नाहीं.' तेव्हां बापानें कबूल केलें. मच्छिन्द्राला आनंद झाला. तो हसत खेळत बापाबरोबर गेला. आईला बरें वाटलें. ती म्हणाली, 'आज लवकर परत या. सणाचा दिवस आहे. मी गोड करणार आहें.' मच्छिन्द्र म्हणाला, 'हो.' मग बापलेक नदीवर गेले. बाप नदींत जाऊन मासे पकडूं लागला. पकडलेले मासे वाळवंटांत आणून टाकूं लागला. ते तडफड करीत उन्हांत भाजूं लागले. पटापट मरूं लागले. तें पाहून मच्छिन्द्राला दया आली. त्याला आपल्या बापाचा राग आला. ह्या बिचाऱ्या प्राण्यांची तडफड त्याला पाहावेना. आपल्या बापाचें कृत्य त्याला निर्दयपणाचें वाटलें. तो एकेक मासा उचलून नदींत टाकूं लागला. मासे पाण्यांत पडले कीं सावध होत आणि पटकन् पळून जात. असें तो करीत आहे, इतक्यांत त्याचा बाप तेथें आला. पाहातो तों मच्छिन्द्र पाण्यांत मासे टाकीत आहे. दुपारची वेळ झालेली. आतांपर्यंत जाळीं टाकलीं, मासे धरले, ते सारे श्रम वायां गेले. आतां बाजारांत जाऊन विकायचें काय ? बापाला फार राग आला आणि त्यानें मच्छिन्द्राला जोरानें एक चपराक लगावली आणि म्हणाला, "जा, नीघ इथून. कांहीं कामाचा नाहींस तूं."

मच्छिन्द्राला आधींच बापाचा राग आला होता. आतां बापानें चपराक दिलेली पाहून तर त्याला अधिकच वाईट वाटलें. त्यानें मासे पाण्यांत



“ जा नीघ इथून, कांहीं कामाचा नाहींस तूं. ”

सोडून दिले, त्यांना जीवदान दिलें, ह्यांत त्यानें वाईट काय केलें होतें, त्याला कळेना. रागाच्या आवेशांत तो उठला आणि चटकन चालता झाला.

बाप पुन्हा जाळें टाकायला गेला. पुन्हा मासे पकडले आणि ते घेऊन तो नेहमीप्रमाणें बाजारांत गेला. उशीर झाला म्हणून झपाझप गेला. मासे विकले. पैसे मिळाले. श्रमांचें सार्थक झालें. त्याला आनंद झाला. बायकापोरांची आठवण झाली. मघांचा प्रसंग आठवला. मच्छिन्द्र घरीं रडत असेल, बायको वाट पाहात असेल म्हणून तो परत झपझप पावलें टाकीत घरीं आला. बायको दाराशीं उभी होती. तिला विचारलें, "मच्छिन्द्र कुठें आहे?" ती म्हणाली, "तो तुमच्याबरोबर गेला तो आला कुठें? मी तुमची केव्हांपासून वाट पाहात आहें. तो बघा खाऊन-सुद्धा गेला नाहीं. तळमळत असेल. आतां येईल, मग येईल म्हणून केव्हांची वाट पाहात आहें." मच्छिन्द्राचा बाप काळजींत पडला. त्याचा चेहेरा सुकून गेला. आई म्हणाली, "काय झालं?" त्यानें सारी हकीकत सांगितली. आईला फार वाईट वाटलें. ती म्हणाली, "एक दिवस कुठें तुमच्याबरोबर आला, तर असं झालं. पुरुषांना नाहींच मुलांशीं नीट वागतां येत. मच्छिन्द्र का मोठा होता? त्याला का समज होती? विनाकारण मारलंत त्याला. आतां तो कुठें गेला असेल कोण जाणे. नेहमीं कांहीं झालं कीं रडत यायचा. पण आज आला नाहीं कांहीं नाहीं." आईचें चित्त व्याकुळ झालें. डोळ्यांवाटे अश्रु स्रवूं लागले. बापालाही फार वाईट वाटलें. तो म्हणाला, "मी जातों शोधायला नि घेऊन येतों त्याला."

मग बाप घराबाहेर पडला. मच्छिन्द्राला शोधूं लागला. 'मच्छिन्द्र' 'मच्छिन्द्र' म्हणून हाका मारूं लागला. पण त्याला ओ मिळाली नाहीं. मच्छिन्द्र कुठें लपला असेल? साऱ्या जागा शोधून पाहिल्या. अंधार व्हायला आला. वारा वाहूं लागला. पावसाचीं चिन्हें दिसूं लागलीं. ढग गर्जूं लागले. विजा मधूनमधून चमकूं लागल्या. म्हणून का

मच्छिन्द्राला हाक ऐकूं येत नव्हती? झाडांझुडपांनीं त्याला लपवून तर नव्हतें ठेवलें? छे, मच्छिन्द्र कुठें दिसेना!

अंधार पसरला. रात्र 'झाली. मच्छिन्द्राचे आईबाप त्याला शोधून शोधून थकले. त्यांना आतां फार काळजी वाटूं लागली. रात्रीं त्यांच्या डोळ्याला डोळा लागला नाहीं. तीं सारखीं मच्छिन्द्राची वाट पाहात होतीं. कुठें खुट्ट वाजलें, पानांची सळसळ झाली, पावसाचे थेंब वाजले किंवा कुणाची चाहूल लागली कीं तीं लगेच बाहेर येत. त्यांना वाटे, 'आला, मच्छिन्द्र आला.' पण पुन्हा निराश होऊन आंत जात. अशी सारखी येरझार चालली होती. जिवाची तगमग झाली होती.

रात्र संपली. दिवस उजाडला. पाऊस थांबला. सूर्याचा प्रकाश पसरला आणि झोपडींत उजेड येऊं लागला. पण ह्या उजेडाचा इथें काय उपयोग? त्या घरांतला खरा प्रकाश तेथें नव्हता. त्या म्हाताऱ्या आईबापांचे डोळे आज हरवले होते. त्यांचा मच्छिन्द्र त्यांना सापडला नव्हता. आई रडत म्हणत होती, "कुठें गेला माझा मच्छिन्द्र! कुठें गेला माझा प्राण!" म्हातारा बापही रडत होता आणि मनाशीं म्हणत होता, "देवा, काय अपराध केला आम्हीं? आमचा मच्छिन्द्र कुठें गेला? मी मच्छिन्द्रावर रागावलों म्हणून का हा कोप केलास? आतां येऊं दे, माझा मच्छिन्द्र येऊं दे. मी त्याला कधीं रागावणार नाहीं. बापाचा मुलावर राग का असतो?"

पण मच्छिन्द्र पुन्हा त्यांना दिसला नाहीं. तो कुठें गेला तो गेलाच!

छोटा मच्छिन्द्र बापावर रागावून जो निघाला तो चालत चालत जंगलांत गेला आणि एका झाडाखालीं बसून रडूं लागला. त्याला आपल्या बापाच्या बोलण्याचा फार राग आला होताच, पण त्यापेक्षांही त्याच्या कृत्याचा जास्त राग आला. ते मासे विचारे किती तळमळत होते, वाळवंटांतल्या उन्हांत तडफडून मरत होते आणि त्यांची दया येऊन आपण त्यांना पाण्यांत टाकलें ह्याबद्दल उलट आपल्या बापानें आपल्यावर रागवावें ह्याचें मच्छिन्द्राला वाईट वाटलें. आजवर त्याचा बाप त्याच्यावर असा कधीं रागावला नव्हता. त्यानें मच्छिन्द्राला कधीं मार दिला नव्हता. त्याला वाटलें होतें, आपला बाप आपल्याला बोलणार तर नाहींच, पण शाबासकी देईल. कारण त्यानें केलें तें एक सत्कृत्य नव्हतें का? ते मासे किती आनंदानें नाचतबागडत पळून गेले! त्यांना खरोखरच किती आनंद झाला असेल? आपल्या बापालाही आनंद व्हायला हवा होता. आपल्यासारखीच त्या गरीब माशांची त्याला दया यायला हवी होती. गरीब प्राण्यांवर दया करावी असें त्यानें आपल्या आईच्या तोंडून ऐकलें होतें, पण तसें त्यानें केलें तेव्हां त्याला त्याबद्दल काय मिळालें होतें? तर मार!

मच्छिन्द्राला रडतां रडतां देवाची आठवण आली. त्यानें लहानपणीं देवाच्या कितीतरी गोष्टी आईच्या तोंडून ऐकल्या होत्या. त्या गोष्टींतला देव किती दयाळू आणि किती प्रेमळ! लहान मुलें तर त्याला फार आवडत. ध्रुवाला त्यानें अढळपद दिलें, उपमन्यूला दुधाचा सागर दिला, प्रल्हादावर त्यानें किती दया दाखविली होती. देव आपल्यावर अशी दया करील का? त्याला साऱ्या गोष्टी दिसतात असें ऐकतों. त्यानें आपलें कृत्य पाहिलें असेलच. त्याला तें आवडलें असेल का? ध्रुव-प्रल्हादाप्रमाणें आपण त्याचे कधींतरी आवडते होऊं का?

दुपारची वेळ. उन्ह वाढत होतें, जमीन तापत होती, पायांना चटके बसत होते, गरम गरम वारे वाहात होते. अशा वेळीं दत्तात्रेय त्या जंगलांतून चालले होते. त्यांनीं मच्छिन्द्राला पाहिलें. जंगलांत एकटाच झाडाखालीं रडत बसलेला मुलगा पाहून दत्तात्रेयांना फार आश्चर्य वाटलें. ते मच्छिन्द्राजवळ गेले आणि म्हणाले, "बाळ, तूं असा रडतोस कां? तुझे आईबाप कुठें हरवले का?"

मच्छिन्द्र म्हणाला, "नाहीं."

"मग तुला भूक का लागली?"

मच्छिन्द्र म्हणाला, "नाहीं."

"मग कुणी तुझ्यावर रागावलं का?"

डोळे पुसत पुसत मच्छिन्द्र म्हणाला, "हो, आज माझे बाबा माझ्यावर फार रागावले. कधीं रागवायचे नाहींत इतके रागावले. पण त्याचं नाहीं मला इतकं वाईट वाटत. ते विचारे मासे उन्हांत तडफडत होते. त्यांची दशा मला पाहवेना, म्हणून मीं त्यांना परत पाण्यांत टाकलं. ह्यांत मीं काय बरं चूक केली? तुम्हीच सांगा, ह्यांत मीं कांहीं वाईट केलं का?"

त्या छोट्या मुलाचें तें भाषण आणि त्या भाषणांतून अनुभवाला येणारें त्याचें दयाळू अंतःकरण पाहून दत्तात्रेयांना पोटांत भडभडून आलें. त्यांनीं त्याला जवळ पोटाशीं धरलें, त्याचे अश्रु पुसले आणि गोड स्वरांत त्याला म्हटलें, "बाळ, तूं वाईट केलं नाहींस. चूक केली नाहींस. तुझे बाबा तुझ्यावर रागावले असले, तरी तुझ्या ह्या दयाळूपणाबद्दल देव तुझ्यावर संतुष्ट होईल. देवाला तुझ्यासारखीं दयाळू मुलं फार आवडतात."

देवाचें नांव ऐकतांच मच्छिन्द्र उठून उभा राहिला आणि म्हणाला, "खरं का? मी देवाला आवडेन? देव मला बक्षीस देईल? माझी आई मला सांगत असते, कीं देव दयाळू आहे. आई नेहमीं मला

देवाच्या कितीतरी गोष्टी सांगते. आई म्हणते, देव लहान मुलांवर ममता करतो. त्यानें ध्रुवबाळाला राज्य दिलं, प्रल्हादाचं रक्षण केलं, उपमन्यूचा हट्ट पुरवला, चिलयाला मांडीवर घेतलं. खरं आहे ना हो हें सारं? मग सांगा ना, मी देवाचा आवडता कसा होईन? मला भेटेल का देव? बोलेल का तो माझ्याशीं? मीही ध्रुवासारखं तप करीन, प्रल्हादासारखा त्याचं नांव घेत राहीन. मग तरी तो येईल ना? देईल ना मला भेट?"

दत्तात्रेय म्हणाले, "हो."

मच्छिन्द्र म्हणाला, "मी आतां घरीं जाणार नाहीं. वनांत जाईन. देवाचा आवडता व्हायला जाईन. देव भेटेल त्या दिवशींच परत येईन. सांगा मला, मी देवाचा आवडता कसा होईन?"

मग दत्तात्रेयांनीं त्याला मंत्र सांगितला. ते म्हणाले, "शंकर सर्वांत मोठा देव. म्हणून त्याला महादेव म्हणतात. तो लवकर प्रसन्न होतो. त्याच्या नांवाचा जप कर. त्याच्या मूर्तीचं ध्यान कर. म्हणजे तुला तो लवकर भेटेल. महादेव भक्तीचा भुकेला आहे. कुणीं आपली भक्ति केली, तर ती महादेवाला फार आवडते."

मग छोटा मच्छिन्द्र जंगलांत गेला आणि तप करूं लागला. एका मोठ्या वडाच्या झाडाखालीं उंचवटा होता तेथें त्यानें आसन मांडलें, मांडी घातली, देवाची मनोभावानें पूजा केली. त्याच्याजवळ ना फूल ना फळ, ना धूप ना दीप. पण कल्पनेनेंच देवाला स्नान घातलें, गंध लावलें, फुलें वाहिलीं, नीरांजन ओवाळलें, उदबत्ती लावली, नैवेद्य दाखविला, प्रदक्षिणा करून साष्टांग नमस्कार घातला आणि नांवाचा जप सुरू केला. डोळ्यांपुढें शंकरांची मूर्ति उभी केली—डोक्यावर जटाजूट, हातांत त्रिशूल, नेसायला व्याघ्रांबर, पायांत पादुका—असें ध्यान तो करूं लागला. सारी सृष्टि कौतुकानें त्याची तपश्चर्या पाहात होती. हळुहळू वाहात येणारा वारा गारवा आणून देई, झाडें त्याच्या अंगावर फळें टाकीत, वेली फुलें देत, पण मच्छिन्द्राचें तिकडे लक्षसुद्धा नसे.

असे तीस दिवस गेले, तीस रात्री गेल्या, एकतिसाव्या रात्रीं एक चमत्कार झाला. दिव्य वस्त्रें परिधान केलेली एक सुंदर देवता मच्छिन्द्रापुढें उभी राहिली. तिचा कमरपट्टा सोन्याचा होता, डोक्यावर मुकुट, पायांत सांखळ्या, अंगावर दागिने चकाकत होते. मच्छिन्द्रानें विचारलें, "तूं कोण?" ती म्हणाली, "मी एक सिद्धि आहें. मला भगवान् शंकरांनीं तुझ्याकडे पाठविलं आहे."

मच्छिन्द्र म्हणाला, "तूं काय देशील?"

ती म्हणाली, "हवं तें देईन. इच्छा करशील तें तुला माझ्यापासून मिळेल. धन मिळेल, उंची वस्त्रं मिळतील, खायला गोड मिळेल, काय हवं तें मिळेल."

मच्छिन्द्र म्हणाला, "मला हें नको. मला भगवान् शंकरांचं दर्शन करून दे."

ती म्हणाली, "तें माझ्या स्वाधीन नाहीं."

मच्छिन्द्र म्हणाला, "मग मला तुझा काय उपयोग?" तेव्हां ती देवता अंतर्धान पावली.

दुसऱ्या महिन्याला पुन्हा असाच चमत्कार घडून आला. दुसरी देवता आली आणि म्हणाली, "मच्छिन्द्र, मी सिद्धि आहें. भगवान् शंकरांनीं मला तुझ्या सेवेसाठीं पाठविलं आहे. माझ्यांत मनुष्यांना, पशूंना, क्रूर जनावरांना, साऱ्यांना वश करण्याचं सामर्थ्य आहे. मी वाघसिंहांना, सर्पांना, साऱ्यांना खेळवूं शकतें." पण मच्छिन्द्रानें उत्तर दिलें, "मला हें नको. मला भगवान् शंकरांचं दर्शन हवं." तेव्हां ती सिद्धि अंतर्धान पावली.

असे आठ महिने गेले. आठ देवता येऊन गेल्या. अष्टसिद्धि त्या! पण मच्छिन्द्रानें त्यांच्याकडे पाहिलें नाहीं. तो त्यांच्या लोभांत अडकला नाहीं.

शेवटीं दत्तात्रेयांना करुणा आली. ते भगवान् शंकरांकडे गेले आणि म्हणाले, "भगवन्, छोटा मच्छिन्द्र तुमच्या नांवाचा सारखा जप करीत आहे. त्याची तुम्हांला आठवण नाहीं का?"

भगवान् शंकर हसले आणि म्हणाले, " वा: ! मीं तर केव्हांच त्याची सोय लावली आहे. मीं माझ्याजवळ असलेल्या आठही सिद्धि त्याच्याकडे पाठविल्या. आतां त्याला तप करायची काय जरूर ? "

दत्तात्रेय म्हणाले, " पुरे झाली तुमची परीक्षा. चला त्याला भेटायला. "

भगवान् शंकर म्हणाले, " तुमच्या सोबतीचीच वाट पाहात होतों. चला. "

मग भगवान् शंकर आणि दत्तात्रेय मच्छिन्द्रापुढें येऊन उभे राहिले. मच्छिन्द्र डोळे उघडून पाहातो, तों दोन देव समोर उभे. त्यानें गुरु दत्तात्रेयांना ओळखलें आणि त्यांच्या पायांवर लोटांगण घातलें. दत्तात्रेयांनीं त्याला उठवलें आणि शंकरांच्या पायांवर घातलें. शंकर म्हणाले, " हा तर माझ्या ओळखीचा. माशाच्या पोटांत होता. ' आवडता ' होईन म्हणून म्हणाला होता. म्हणून का इथें धाव घेतली ? ठीक आहे. मी तुला माझ्याजवळची योगविद्या देतों. अष्टसिद्धींपेक्षां श्रेष्ठ अशी ही योगविद्या आहे. पण आवडता होण्याला काय करावं लागतं, तें नाहीं मला सांगतां यायचं. तें दत्तात्रेयच तुला शिकवील. देवांना आपल्या नादीं कसं लावायचं, त्यांना आपल्यावर प्रेम कसं करायला लावायचं तें आमच्या दत्तात्रेयालाच नीट माहीत आहे. "

दत्तात्रेय हसले आणि म्हणाले, " प्रभु, मी तर अवधूत, बैरागी. चार ठिकाणीं हिंडतों, भिक्षा मागतों आणि खातों. ना घरदार, ना कांहीं. मी कुणाला काय देणार ? काय शिकविणार ? तुम्ही साऱ्या त्रैलोक्याचे स्वामी. कां माझी चेष्टा करतां ? मी ह्याला काय झोळी देणार, का भस्म, का ही हातांतली पुंगी ? "

" हो. द्या ती झोळी, तें भस्म, ती पुंगी. तीच तर मोठी महत्त्वाची. लोकांना वाटतं, दत्तात्रेय किती साधेभोळे; पण लोकांना वश करण्याची किती शक्ति ! मी महादेव म्हणवतों, पण एकीकडे स्मशानांत राहातों. कुणी माझ्याकडे येत नाहीं. पण तुम्हांला पाहिलं, म्हणजे लोक कसे

पाठीमागें धावतात. कारण साऱ्यां सिद्धांचे तुम्ही गुरु. वैराग्यांचे राजे. योगेश्वर, शिकवा ह्या मच्छिन्द्राला. याला तुमच्यासारखा सिद्ध करा. हिंडूं द्या लोकांत. एकान्तांत बसणारा मी त्याला काय सांगणार ? त्यानें लोकांत हिंडावं, चमत्कार दाखवावे आणि लोकांचीं मनं सन्मार्गाकडे वळवावीं."

"तुमची सल्ला असेल तर तसंही होईल. ज्याच्यावर महादेवाची, आदिनाथाची कृपा, त्याला जग जिंकायला उशीर काय ?"

मच्छिन्द्र त्या दोघा देवांचा हा संवाद ऐकत होता. दोन मोठ्या देवांचा प्रेमळ संवाद ! दोघे एकमेकांना गौरवीत होते, एकमेकांना मोठे म्हणत होते आणि माणसें मात्र एक देव मोठा, दुसरा देव लहान, म्हणून आपापसांत उगीच भांडण करीत होतीं. हे देव शिष्य मिळविण्यासाठीं भांडत नव्हते, तर जवळ आलेल्याचें जास्तींत जास्त कल्याण व्हावें हीच त्यांची इच्छा होती.

मच्छिन्द्रानें दोघांना वंदन केलें. त्यांच्या चरणांची धूळ मस्तकीं लावली आणि म्हटलें, "प्रभु, तुम्ही दोघेही देव. दोघेही मला वंद्य. दोघेही आदरणीय. तुम्ही दोघेही माझं कल्याण पाहाणारे. माझ्यावर कृपा करा आणि माझं हित होईल असा मार्ग मला दाखवा."

भगवान् शंकर म्हणाले, "बाळ मच्छिन्द्र, लोककल्याणाचं कृत्य हेंच ह्या जगांतलं मोठं कृत्य. हें जो करील तोच देवाचा खरा आवडता होईल. मच्छिन्द्र, तुला देवाचा आवडता व्हायचं आहे ना ? मग हें काम हातीं घे. दिसायला लहान आणि सोपं. पण सर्वांत कठीण आणि महत्त्वाचं. घे ही झोळी, हें भस्म, ही पुंगी. आजपासून तूं नुसता मच्छिन्द्र नव्हे, तर मच्छिन्द्रनाथ आहेस. ही योगविद्या मी तुला देतों. तिच्या बळावर तूं योगेश्वर म्हणून जगांत गाजशील. ही झोळी घे. ही भिक्षेची झोळी म्हणून क्षुद्र समजूं नकोस. ह्यांत सिद्धि आहेत, चमत्कार आहेत. ह्या जगांत चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं. ते चमत्कार करून

लोकांचीं मनं चांगल्या मार्गाकडे वळवायला हरकत नाहीं. ह्या भस्मांत मोठं सामर्थ्य आहे. तें तुझ्याजवळ नेहमीं गुप्तपणें सोबतीला राहील. ह्या पुंगीनें लोकांचीं मनं वेधून घेतां येतील. ह्या साऱ्या शक्ति तुला नेहमीं मदत करायला हाक मारतांक्षणीं धावत येतील. गुरु दत्तात्रेयांप्रमाणें संचार कर आणि नाथपंथाचा प्रसार कर. देवाचं नांव घ्यावं आणि चांगला संसार करावा ही सोपी शिकवण दे आणि जगाचा उद्धार कर. जगाला देवाचं स्मरण करायला शिकीव. देवाच्या आवडत्या मार्गानें जायला शिकीव."

मच्छिन्द्रानें भगवान् शंकरांना वंदन केलें आणि म्हटलें, "तुमच्या आज्ञेप्रमाणें करीन."

मग भगवान् शंकर आणि दत्तात्रेय अंतर्धान पावले.

## ५ ★ ★ ★ राजाला शिक्षा

मच्छिन्द्रनाथ तीर्थयात्रा करीत हिंडत होते. साधुबैरागी नेहमीं हिंडताफिरता असावा. त्यानें एकान्तांत जाऊन बसण्यापेक्षां जमावांत मिसळावें, जेथें लोक जमतात तेथें जावें, जत्रा, उत्सव अशा ठिकाणीं भाग घ्यावा; तरच चार लोकांचीं सुखःदुखें त्याला कळतील, त्यांना सन्मार्गाची दिशा दाखवितां येईल, त्यांचें कल्याण करतां येईल. भगवान् शंकर योगी आणि अवधूत दत्तात्रेयही योगी. पण एक लोकांना सोडून स्मशानांत बसतो, तर दुसरा भिक्षेच्या निमित्तानें लोकांत मिसळतो. एक जवळ येईल त्या भक्ताचें कल्याण करतो तर दुसरा आपण होऊन भक्ताला भेट देतो, त्याच्या सुखदुःखाची चौकशी करतो. दोघेही तपस्वी,

दोघेही निरिच्छ, दोघेही भिक्षाटन करणारे, दोघांनींही संसाराची काळजी सोडलेली, दोघांनाही जगाचें कल्याण कसें होईल, जग कसें सुधारेल ह्याचीच जास्त काळजी. पण दोघांच्या पद्धतींत किती फरक! एक हिमालयाच्या शिखरावर बसलेला, तर दुसरा पृथ्वीच्या पाठीवर कुठेंही फिरत असलेला. एकाला पाहायला जावें तर डोंगर चढावे लागतात, थोडेंसें उंचीवर जावें लागतें. पण सारींच माणसें इतक्या उंचीवर कशाला जातील? कशाला डोंगर चढतील? कशाला श्रम घेतील? देवाला शोधायला, त्याची भेट घ्यायला कां होईना, डोंगर चढून जाण्याची त्यांना इच्छा नसते. देव आपण होऊन जवळ आला तर त्यांना हवा असतो. सोपा, सुलभ, दिसणारा, बोलणारा, आपल्यांत येऊन मिसळणारा देव त्यांना हवा असतो. म्हणूनच ना गुरु दत्तात्रेय नेहमीं भटकत असतात!

मच्छिन्द्रनाथांना, तसें पाहिलें तर, दोघेही देव वंद्य. दोघेही आदरणीय. पण स्वतः मच्छिन्द्रनाथांना वाटे, गुरु दत्तात्रेयांचाच मार्ग उत्तम. ह्या मार्गानें लोकांचें कल्याण जास्त जवळचें. लोकांना त्यांच्या कल्याणाचा मार्ग सांगायचा, तर त्यांच्याजवळ जाऊन पोचलें पाहिजे. त्यांना आपला उपदेश स्वतः पटविला पाहिजे. ते स्वतः आपल्या कल्याणाची इच्छा करतात, पण खरें हित कशांत आहे हें त्यांना कळत नाहीं. तें त्यांचें हित त्यांना पटवून दिलें पाहिजे. त्यांचें अज्ञान दूर करायला हवें, रस्ता चुकला तर नीट मार्गाला लावायला हवें. तो मार्ग त्यांना सोपा आणि सुखाचा वाटेल असें करायला हवें. सारीं माणसें संसार सोडूं शकत नाहींत आणि तो सोडण्याची जरुरी नाहीं. सारीं माणसें जंगलांत जातील, भिक्षा मागतील, तर जग चालणार कसें? तेव्हां जगाचें हित करायचें असेल, तर जगाची काळजी बाळगणाऱ्या साधुवैराग्यांनीं वनांत न राहातां जनांत राहिलें पाहिजे, त्यांच्यांत मिसळलें पाहिजे, त्यांचीं सुखदुःखें लक्षांत घेतलीं पाहिजेत आणि ज्यामुळें त्यांचें लक्ष चांगल्या मार्गाकडे लागेल असें केलें पाहिजे. चुकलें तर त्यांना सावरलें पाहिजे, नीट रस्त्यावर आणलें पाहिजे.

हा गुरु दत्तात्रेयांचा मच्छिन्द्रनाथांना उपदेश होता. तो उपदेश लक्षांत घेऊन त्यांनीं तीर्थयात्रा करायला सुरुवात केली. जागोजागीं हिंडावें, निरनिराळे देश पाहावे, लोकांत जाऊन बसावें, भिक्षेच्या निमित्तानें त्यांच्यांत मिसळावें, त्यांची स्थिति लक्षांत घ्यावी, चित्तांत ठसवावी, त्यावर विचार करावा, चार लोक जेथें जमतील तेथें मुद्दाम जावें ; कारण अशा ठिकाणीं पुष्कळ लोक जमतात, एकत्र होतात, आपलीं सुखदु:खें सांगतात, भावभावना प्रकट करतात. लोकांच्या भावना कळायला त्यांच्याशीं एकरूप होतां आलें पाहिजे. जत्रा, उत्सव अशा प्रसंगीं माणूस झटकन् चारचौघांशीं समरस होतो. मोठमोठ्या क्षेत्रांत उत्सव होतात, दूरदूरचे लोक येतात, त्यांच्या गांठीभेटी होतात, स्नेह वृद्धिंगत होतो, ओळख वाढते आणि जीं कामें व्हायचीं नाहींत तीं चार लोकांच्या मदतीनें लवकर पार पाडतां येतात.

हें सारें लक्षांत ठेवून मच्छिन्द्रनाथ निरनिराळ्या जमावांत मिसळले होते. तडीतापसी लोकांबरोबर राहिले, यात्रेकरूंच्या सोबतीसोबतीनें चालले, त्यांनीं व्यापाऱ्यांच्या मेळ्यांत दिवस काढले, नावा चालविणारे नावाडी, मासे धरणारे कोळी, वस्त्रें धुणारे परीट, शहराची रखवाली करणारे रखवालदार, गुरें चारणारे गुराखी, शेतकरी, भिकारी अशा लहानांतल्या लहान जातींत ते मिसळले होते. थोडक्या सुखाच्या झुळकेनें आनंद मानावा, थोडक्या सत्तेनें माजून जावें, थोड्याशा आशेनें वाटेल तीं पापें करावींत, थोडासा दु:खाचा चटका बसला कीं भयभीत व्हावें, अशीं तीं सारीं माणसें होतीं. फुलांच्या माळेंतून एक दोरा धावतो ना तशी साऱ्या लोकांची अवस्था होती. एकमेकांत भांडावें, एकमेकांचे गळे दाबावे, पैशासाठीं खुशाल खोटें बोलावें. तें सारें पाहिलें, म्हणजे मच्छिन्द्रनाथांना वाईट वाटे. लहानांना तरी काय म्हणायचें ? मोठ्यांची हीच स्थिति होती. हे मोठे लोक सुधारले, तर लहान माणसेंही सुधारतील असें मच्छिन्द्रनाथांना वाटे.

लोकांमध्यें मिळून मिसळून राहावें, त्यांच्याबरोबर गोष्टी कराव्या, सोबतीसोबतीनें हिंडावें, जमावांत संधि मिळेल तेव्हां मिसळावें, तीर्थयात्रेच्या निमित्तानें देश पाहावे असा मच्छिन्द्रनाथांचा क्रम चालला होता. त्यांत त्यांना मोठा आनंद वाटत होता.

असेच फिरतां फिरतां मच्छिन्द्रनाथ शरयू नदीच्या कांठीं आले. पाहातात तों घाटावर खूप गर्दी. हजारों लोक जमले होते. बायाबापड्या, गरीब भिकारी, मुलेंबाळें, साऱ्यांची रस्त्यांत जणूं रीघ लागली होती. शहरांत सारीकडे गुढ्या उभारल्या होत्या, उंच उंच गुढ्या ! उंच उंच पताका ! घरींदारीं तोरणें ! त्या चित्रविचित्र रंगांच्या फडकणाऱ्या पताका जणूं हाका मारीत होत्या. तीं तोरणें जणूं कुणाची वाट पाहात होतीं. रस्त्यांतून जाणारे लोकांचे थवे भजन करीत, टाळ्या पिटीत चालले होते. बायांच्या गाण्याचे मंजुळ सूर ऐकूं येत होते. कुठून तरी सनईचा गोड आवाज कानांवर येत होता. देवाघरचा चौघडा मधूनमधून आवाज करीत होता. टाळमृदंगाचे घोष ऐकूं येत होते. देवळांतल्या घंटा वाजत होत्या. शंखांचे नाद ऐकूं येत होते. सुवासिनी स्त्रिया नीरांजनें घेऊन गाणीं गात चालल्या होत्या. जिकडे तिकडे फुलांचा घमघमाट, नीरांजनांच्या ज्योति. बायका गाणीं गात होत्या, त्या गाण्यांच्या ओळींओळींत गोडी होती, भक्तिभाव होता. ते गाण्याचे सूर मधुर, आळवणें मधुर आणि गाण्यांतून ओथंबत असलेल्या कथा देखील मधुर ! राजा रामचंद्राच्या पुण्यपावन कथा होत्या त्या. हजारों लोकांच्या अंतःकरणाला चटका लावणाऱ्या कथा, गायला लावणाऱ्या कथा, हात जोडायला लावणाऱ्या कथा. रामचंद्राचें नांव काढलें, म्हणजे कुणाचें हृदय ओलें होत नाहीं ? कुणाच्या मनांत भक्तिभाव दाटून येत नाहीं ? पित्याच्या आज्ञेसाठीं वनांत जाणारा, सावत्रपणाचा कलंक कुटुंबाला लागूं नये म्हणून जपणारा, भावाभावांत भांडण होऊं नये म्हणून राज्य सोडणारा, पापी राक्षसांचीं शिरें उडविणारा आणि लोकांच्या सुखापुढें स्वतःच्या संसाराची फिकीर न करणारा राजा राम !

आपल्या थोर आचरणामुळें 'देव' पदवीला चढला, हजारों लोकांना प्रिय झाला, हजारों लोकांच्या हृदयसिंहासनावर जाऊन बसला. मग तो देवाप्रमाणें देव्हाऱ्यांत जाऊन बसला त्यांत नवल काय?

असा तो अयोध्येचा पुण्यश्लोक राजा रामचंद्र आणि ही त्याची आवडती नगरी अयोध्या. राजा रामचंद्राच्या जन्मकाळाची आठवण देणारी, जन्मदिन साजरा करण्यासाठीं नटलेली, प्रफुल्लित झालेली अयोध्या. राजा रामचंद्राचे गुण गाण्यांत तन्मय झालेले ते लोक! राजा रामाच्या देवालयाकडे दर्शनासाठीं जाणारा तो मोठा जमाव किती संथपणें, हळुहळू चालला होता. पण प्रत्येकाचें मन अधीर झालें होतें. तो देखावा पाहून मच्छिन्द्रनाथांचें हृदय आनंदानें भरून आलें. रामचंद्राचें दर्शन कुणाला आवडणार नाहीं? साधुवैराग्याला तर तें अगदीं अवश्य. रामचंद्राचें दर्शन घ्यावें, त्याच्या पुण्यकृत्यांचें स्मरण ठेवावें आणि त्यानें उजळत ठेवलेली लोककल्याणाची ज्योत आपणही तेवत ठेवावी, हें तर साधुवैराग्यांचें कार्य. जे लोकांच्या सुखासाठीं झटले आणि लोकांचे आवडते झाले, तेच देव्हाऱ्यांत देव होऊन बसतात. हजारों लोकांच्या जिभेवर त्यांचें नांव नाचत राहातें. त्यांच्या कथा स्मरणांत राहातात. अशा देवाचें दर्शन कोण घेणार नाहीं?

मच्छिन्द्रनाथ मोठ्या खुषीनें त्या अथांग जमावांत मिसळले. तो अथांग समुदाय म्हणजे एक जणूं भला थोरला समुद्रच होता. त्या समुद्रांत आतां एक छोटीशी नदी मिसळली. हजारों फुलांच्या गुच्छांत आणखी एक सुवासिक फूल पडलें. नदी सागराशीं एकरूप होते, तसे मच्छिन्द्रनाथ त्या समाजाशीं एकरूप झाले. हृदयांतला भक्तिभाव फुलाप्रमाणें ते रामचंद्राला वाहायला घेऊन चालले. त्यांच्याजवळ फुलें नव्हतीं, पण भक्तिभाव होता. नीरांजन नव्हतें, पण हृदयांत ज्ञानाचा प्रकाश होता. त्या गोड कथा ऐकतां ऐकतां ते तन्मय झाले. स्वतः सुरांत सूर मिसळूं लागले, आळवूं लागले. वाटेवर उभे असलेले लोक म्हणत, 'राजा रामचंद्र की जय!'

मच्छिन्द्रनाथही जयघोष करूं लागले. तो जयघोष काय केवळ रामचंद्राचा होता? हजारों पुण्यश्लोकांचा, लोककल्याणासाठीं तळमळणाऱ्या श्रेष्ठ पुरुषांचा तो जयजयकार होता.

पण हें काय? चालतां चालतां तो जमाव एकदम थबकला. धड पुढें जातां येईना, धड मागें सरतां येईना. नदीचा पुढें चाललेला ओघ एकदम मागें कसा सरेल? पुढें पुढें चाललेलीं पावलें मागें कशीं घेतां येतील? समुद्रासारखी अफाट अशी ती गर्दी एकाएकीं थांबणार तरी कशी? पण लोकांचें पाऊल पुढें पडेना, जागच्याजागीं राहीना. गर्दी मागें रेटली जाऊं लागली. देवळांत नगराचा राजा पूजा करायला आला होता. देवळापुढल्या मैदानांत त्याचे हत्ती घोडे डामडौलानें उभे होते. राजाची फौज तेथें उभी होती. चांगले चांगले पोशाख केलेले राजाचे नोकरचाकर तेथें मिरवत होते. तेथें ही भिकाऱ्यांची, गरीब लोकांची गर्दी कशी जाऊं शकेल? राजाची पूजा चालली असतां लोकांना देवळांत कसें जातां येईल? राजाचीं माणसें लोकांना हटवूं लागलीं, मागें हाकलूं लागलीं. लोक मागें पुढें ढकलले जाऊं लागले. मग काय, त्या हजारों लोकांच्या गर्दींत एकच गोंधळ माजला. कुणाचे हातपाय चेंगरले, कुणी घसरून पडले, कुणाच्या हातापायांना इजा झाली, कुणी बेशुद्ध होऊन पडले. म्हाताऱ्या लोकांना, बायाबापड्यांना आणि मुलांना काय त्रास झाला तो विचारूं नका. तीं बिचारीं तळमळूं लागलीं.

दर्शनाच्या आशेनें आलेला एवढा मोठा जमाव रस्त्यांत अडकून पडला. देवळांत राजाची पूजा चालली होती ना! देवळाच्या दारांत त्याचे हत्तीघोडे झुलत होते, नोकरचाकर मिरवीत होते. त्या वैभवाच्या दिमाखांत ह्या साध्या लोकांचा भोळा भक्तिभाव कुणाला दिसणार? दूरदूरचीं माणसें दर्शनाला आलेलीं, तहानभुकेनें व्याकुळ झालेलीं; मुलें रडत आहेत, म्हातारे विव्हळत आहेत, बायकांची त्रेधा उडाली आहे. वरून चैत्राचें ऊन कसें लखलख् तळपत होतें. ऐन दुपारची वेळ झालेली. पायांना

चटके बसत आहेत, तोंडाला कोरड पडली आहे अशा स्थितींत दीनवाणें तोंड करून तो सारा जमाव दर्शनाच्या आशेनें देवळाकडे तोंड करून उभा राहिला.

मच्छिन्द्रनाथांचें हृदय तो देखावा पाहून तळमळूं लागलें. त्यांना राजाचा राग आला. देवळाच्या दारांत लोकांनीं केविलवाणें तोंड करून दर्शनासाठीं ताटकळत असावें, त्यांना उभें राहायलासुद्धा परवानगी मिळूं नये ! उलट राजाच्या लोकांनीं बडवावें, मारहाण करावी, उन्हांत तळमळूं द्यावें आणि त्याची कांहींएक पर्वा न करतां राजाची पूजा धूमधडाक्यानें आणि मोठ्या भपक्यांत चालू असावी ! लोकांवर झालेला ह्या अन्याय त्यांनीं कुणाला सांगायचा ? कुणाजवळ दाद मागायची ? गाऱ्हाणें कुणाजवळ न्यायचें ? प्रजेचें गाऱ्हाणें ऐकून घ्यावें, त्यांच्या सुखदु:खाची चौकशी करावी हें राजाचें काम. पण त्याऐवजीं राजा उलट त्यांच्या छळाला कारण होत होता. राजाची पूजा चालली होती आणि भाविक लोकांना चोप बसत होता. देवाच्या दर्शनाला विरोध करणारा हा राजा कोण ? चंद्राचें चांदणें काय, कुणींही उपभोगावें, फुलाचा वास कुणींही घ्यावा, नदीचें पाणी कुणींही प्यावें, झाडांनीं आल्यागेल्यांना छाया द्यावी. तसेंच देवाचें दर्शन कुणींही घ्यावें ! देव हा काय कुणा एकट्याचा आहे ? जो भक्तिभाव बाळगील, पूजा करील, फुलें वाहील त्याचा देव. पण देवाची पूजा करायला आलेल्या ह्या हजारों भाविकांचा भक्तिभाव राजानें कोंडून ठेवला, फुलें पायांखालीं घातलीं, पूजा नासली. म्हातारे, गरीब, बाया, भिकारी हे सारे लोक म्हणत होते, "आम्ही गरीब दुबळे, म्हणून का देव आम्हांला दूर लोटत आहे ?" मच्छिन्द्रनाथांना तें ऐकवेना, तो छळ पाहावेना. लोकांचा छळ साधु-बैराग्याला पाहावत नाहीं. लोकांना केलेला अन्याय त्याला सहन होत नाहीं. मच्छिन्द्रनाथांनीं विचार केला कीं लोकांना झालेल्या अन्यायाचा बदला घेतला पाहिजे. राजाला शिक्षा झाली पाहिजे. साधुपुरुषांचें सामर्थ्य आणि

सिद्धि अशाच कामासाठीं योजायचीं असतात. राजाला शिक्षा करायची असा मच्छिन्द्रनाथांचा निश्चय झाला.

आंत राजाची पूजा अद्याप चाललीच होती. शहरचा राजा आपलें वैभव दाखवून देवाला दिपवूं पाहात होता. त्याला कसली घाई होती? सावकाश चालली होती पूजा. सोन्याचें सिंहासन मांडलें होतें. धूपदीपांच्या प्रकाशानें आणि सुवासानें सारा गाभारा भरला होता. सोन्याची झारी, सोन्याचें ताम्हन, त्यांत देवाला स्नान घालणें चाललें होतें. राजा देवाला न्हाऊं घालत होता, बाहेर लोक उन्हांत तळमळत होते. राजा देवाला नैवेद्य दाखवीत होता, बाहेर मुलें भुकेनें रडत होतीं. राजा देवाला वस्त्रें देत होता, बाहेर लोक मार खात होते. होतां होतां आरती झाली, शंख वाजूं लागले, घंटा निनादूं लागल्या, सनई आणि चौघडा वाजूं लागला. मग पूजा संपली. राजानें देवाला साष्टांग नमस्कार घातला.

तों काय गंमत, नमस्कार घालतां घालतां राजा जमिनीला चिकटला. त्याला उठतां येईना. उठण्याचा खूप प्रयत्न केला. पण हातपाय जमिनीला बांधल्यासारखे झाले. जवळच्या लोकांनीं खूप जोर लावला. पण छे! राजाला उठतां येईना. शेवटीं प्रधानाला हाक गेली. तो येऊन पाहातो, तों राजा जमिनीवर पडलेला. प्रधान चतुर होता. त्याच्या लक्षांत आलें, राजाची कांहींतरी चूक झाली होती; म्हणून देवता कोपली. देवाच्या भक्ताचा, साधुसंताचा, कुणाचा तरी अपमान झाला असावा. साधूचा कोप म्हणजे देवाचा कोप. पण कुठें आणि कसा सापडणार असा साधु! बाहेरच्या जमात्रांत तर नाहीं ना एखादा सिद्धपुरुष आलेला? त्याचा कांहीं अपमान तर नाहीं ना झाला? जमावाला लोकांनीं चोपलें म्हणून त्याला राग आला नाहीं ना? पण त्या सिद्धपुरुषाला शोधायचें तरी कसें?

शेवटीं प्रधानानें आज्ञा केली कीं जमावाला आंत येण्याची परवानगी द्या. त्यांचा रस्ता सोडा आणि एकेकाला येथें घेऊन या. मग हळुहळू लोक दर्शनाला येऊं लागले. त्यांनीं देवाला फुलें वाहिलीं, नीरांजनें

ओवाळलीं, नारळ, उदबत्ती जें देवाला देतां येईल तें समर्पण केलें, नैवेद्य आणला तो अर्पण केला आणि हात जोडले. असे सारे लोक आले. तडीतापसी, यात्रेकरू, भिकारी, म्हातारे, मुलें, सुवासिनी सारे आले, दर्शन घेऊन गेले. पण अजून राजा उठेना. प्रधान पाहात होता. त्याला चिंता वाटत होती. राजादेखील थकला होता.

शेवटीं मच्छिन्द्रनाथांची पाळी आली. मच्छिन्द्रनाथ देवळांत आले. त्यांनीं देवाचें दर्शन घेतलें. हात जोडले. मग त्यांनीं समोर पाहिलें. राजा अद्याप जमिनीवर पडलेला. पुष्कळ वेळ झाला. त्यांना दया आली. 'पुरे झाली शिक्षा' असें ते मनाशीं म्हणाले. ते राजाजवळ आले आणि त्यांनीं त्याच्या मस्तकावर हात ठेवला. काय चमत्कार! राजा एकदम उठून बसला. त्याचे हातपाय मुक्त झाले. राजाच्या लक्षांत आलें कीं हा सर्व ह्या सिद्धपुरुषाचा प्रताप. मग त्यानें उठून मच्छिन्द्रनाथांचे पाय धरले आणि म्हटलें, "महाराज, आपण साधुसंत म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर. आम्ही तुमचीं मुलं. असं असतांना आज एवढा राग केलात, जबर शिक्षा दिलीत; असा कोणता अपराध घडला माझ्या हातून? काय चूक झाली?"

मच्छिन्द्रनाथ हसले आणि म्हणाले, "राजा, तूं प्रजेचा न्याय करणारा, सुखदुःखं पाहाणारा. पण आज लक्षावधि लोकांना तूं उन्हांत तळमळत ठेवलंस. तुझ्या नोकरांनीं त्यांना मार दिला तरी तुझी पूजा चाललेली. देव काय तुझ्या एकट्याचा आहे? त्या गरीब लोकांना देवळाच्या दाराशीं तळमळत ठेवलंस, त्याची ही शिक्षा तुला झाली. आतां पुन्हा असं करूं नकोस. राजानें प्रजेचा न्याय करायचा, तिला सुख द्यायचं, हें आपलं कर्तव्य ह्यापुढें विसरूं नकोस."

राजानें मच्छिन्द्रनाथांच्या पायांवर डोकें ठेवलें आणि क्षमा मागितली. त्या दिवसापासून अयोध्येचा राजा मच्छिन्द्रनाथांचा शिष्य झाला.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

# ६ ★ ★ चोर साव बनले

रामनवमीचा उत्सव संपला. जत्रा पांगली. लोक आपापल्या घरीं गेले. वर्षाकांठीं एकदा देवाच्या दर्शनाला आतुरतेनें धाव घेतल्याप्रमाणें आले होते. येतांना उत्सुकतेनें आले. जातांना उत्साह घेऊन गेले.

पण अयोध्यानगरीपुरतें म्हणाल तर जत्रा जणुं अद्याप संपलीच नव्हती. उत्सुकता संपली नाहीं. गर्दी आटली नाहीं. हे बघा, राजरस्त्यावरील भाविकांचे थवे. कुठें जात आहेत हे ? ते चालले होते राजवाड्याकडे. कुठें ? राजाच्या भेटीला ? नाहीं ! नाहीं ! ते चालले होते एका साधुपुरुषाच्या भेटीला, एका महात्म्याच्या दर्शनाला. राजवाड्यांत राहाणाऱ्या एका सिद्धपुरुषाच्या पायां पडायला.

तऱ्हेतऱ्हेचे लोक मच्छिन्द्रनाथांना भेटायला येत आणि तऱ्हेतऱ्हेचीं गाऱ्हाणीं गात. साऱ्या विपत्तीच्या कथा, साऱ्या जखमांच्या व्यथा. साधुसंतांकडे येणारीं माणसें कशा हेतूनें येतात पाहा ! कुणाला हवें असतें धन तर कुणाला हवा असतो पुत्र. कुणाला कोणतें दुःख तर कुणाला कोणत्या व्यथा. एका म्हातारीचा एकुलता एक मुलगा देशान्तराला गेला आहे तो केव्हां येईल ? एका वाण्याचा धंदा बसला आहे त्याला ऊर्जितावस्था केव्हां येईल ? एका कुटुंबांतला कर्ता माणूस रोगानें ग्रासला आहे तो बरा कसा होईल ? कुणा वैश्याचें जहाज चोरांनीं लुटलें त्यानें आतां काय करावें ? असे एक ना दोन, हजारों प्रश्न. संसारांतल्या चिंतांचें, व्याधींचें आणि दुःखांचें गांठोडें तें मच्छिन्द्रनाथांच्या पायांपाशीं आणून टाकीत. त्या गांठोड्यांतल्या चिंध्यान् चिंध्या त्याच्याजवळ उकलून दाखवीत आणि ह्या फाटक्या चिंध्यांचें पुन्हा एकसंधी सुंदर वस्त्र कधीं होईल व त्याला सोन्याचें मोल कधीं येईल असें विचारीत.

मच्छिन्द्रनाथांना हा अनुभव नवा नव्हता. जगांतले दुःखांचे डोंगर, संकटांच्या जाळ्या, चिंतेचा वणवा, आधिव्याधींच्या भयानक दऱ्या त्यांच्या परिचयाच्या होत्या. माणूस दुःखानें विव्हळतो, काळजीनें पोळतो किंवा व्याधीनें जळतो तेव्हांच तो देवाकडे पळतो, साधुसंतांकडे धाव घेतो.

राजानें मच्छिन्द्रनाथांचा प्रताप राणीला ऐकवला. राणी प्रथम विस्मयचकित झाली. मग थोडीशी आनंदली. एरव्हीं दुःखी वाटणाऱ्या तिच्या चर्येवर प्रसन्नता उमलली. तिच्या डोळ्यांत हर्ष चकाकूं लागला. राणीचीं मुलें जगत नसत. ओटी सफळ होत नव्हती. काळपुरुषानें निर्दयपणें तिचीं बाळें तिच्याजवळून ओढून नेलीं होतीं. अंगणांतलीं फुलें जणुं वाऱ्यानें उधळून नेलीं. ज्या अंगणांत फुलें नाहींत तेथें सुवास कसला? ज्या घरांत मुलें नाहींत तेथें उल्हास कसला?

म्हणूनच राणीला हा वृत्तान्त ऐकून बरें वाटलें. तिच्या मनांत आलें, असल्या सिद्ध पुरुषाच्या कृपेनें तरी आपली ओटी लेकराबाळांनीं भरेल. आपला कुसवा सफळ होईल. आपण त्याची परोपरीनें सेवा करूं. त्याला संतुष्ट करूं.

राणी गर्भिणी होती. पांचसहा महिन्यांनीं बाळंत होणार. आणि मग पुढें.... पुढें काय? आजवर जें झालें तेंच. सटवाईची अवकृपा आणि काळपुरुषाचा खेळ!

ह्या सिद्ध पुरुषाची सेवा केली तर.... तर आपलें बाळ जगणार नाहीं का? महात्म्यांच्या आशीर्वादानें काय होत नाहीं?

राणीनें आपला विचार राजाला ऐकविला. राजालाही तो मान्य झाला. तो आनंदानें राणीला म्हणाला, "राणी, तुझं म्हणणं खरं आहे. तुझा विचार योग्य आहे. बऱ्याच दिवसांनीं असला महात्मा आपल्या घरीं चालून आला. आपली पुण्याई जागी झाली असं समज. ह्या महात्म्याची सेवा कर. त्याला संतुष्ट ठेव. तुझं घर पुन्हा फुलेल. तुझी ओटी भरेल.

तुझीं मुलं जगतील. असले महात्मे म्हणजे देवानें पृथ्वीवर धाडलेले कल्पतरुच!"

मग संधि साधून एक दिवस राजानें मच्छिन्द्रनाथांना राजवाड्यांत आणलें. अंबारींतून मिरवत आणलें. षोडशोपचारांनीं त्यांची पूजा केली. मोठा समारंभ केला आणि विनंती केली, "महाराज, चार दिवस राजवाड्यांत राहा आणि आमची सेवा घ्या."

राणीनेंही पायां पडून विनविलें, "महाराज, माझीं मुलं जगत नाहींत. हें पोटांतलं बाळ तरी जगेल असं करा. माझा कुसवा सफळ करा. ह्या मुलाला आपला आशीर्वाद असूं द्या. माझ्याकडून सेवा ती काय होणार? पण होईल ती सेवा गोड करून घ्या."

मच्छिन्द्रनाथांनीं राणीची विनंती ऐकली आणि तेव्हांपासून ते राजवाड्यांत राहूं लागले.

पण ते राजवाड्यांत आले म्हणून लोकांनीं त्यांना सोडलें नव्हतें. मच्छिन्द्रनाथांनींही राजाला सांगितलें होतें कीं "राजा, माझ्याकडे कुणी येईल त्याला मज्जाव नसावा. साधूचा दरवाजा नेहमीं सर्वांनाच उघडा असावा."

राजाराणी सेवा करूं लागलीं. सारेच लोक येऊं लागले. सेवा करूं लागले. गाऱ्हाणें गाऊं लागले. दुःखें सांगत आणि मागणें मागत.

जी गोष्ट राजाची तीच प्रधानाची आणि तशीच सेनापतीची. साऱ्यांचें म्हणणें एकच. साऱ्यांचें मागणेंही एकच. आमचं दुःख दूर करा. आमची व्याधि संपेल असं करा. प्रधानाचा मुलगा वेडा झाला होता तर सेनापतीची तरुण सुंदर स्त्री रोगानें ग्रस्त होऊन अंथरुणावर पडली होती. कुणा धनिकाच्या घरांतील सुनेला भुतानें पछाडलें होतें तर कुणा सरदाराचा जावई त्याच्या लेकीचा छळ करीत होता.

हें ऐकलें म्हणजे मच्छिन्द्रनाथांना मनांतल्या मनांत हसूं येई. हीं काय खरींखुरीं दुःखें होतीं! सारीं कृत्रिम, सारीं वरवरचीं, सारीं भडक दुःखें.

ह्या लोकांना कसें सांगायचें कीं तुम्ही आपल्या दुःखाचा इतका बाऊ करतां पण जगांत ह्याहून अनंत दुःखें आहेत. तुमच्या जावयानें तुमच्या लेकीचा छळ केला म्हणून म्हणतां, पण बाहेरच्या उघड्या मैदानावरील थंडी हजारोंना छळत आहे. तुमच्या सुनेला भुतानें ग्रासलें म्हणून रडतांहांत पण बाहेर हजारों लोक भुकेनें ग्रासलेले अर्धपोटीं जगत आहेत. तुमचीं मुलेंबाळें जगत नाहींत म्हणून चिंता पण बाहेरच्या जगांतल्या एखाद्या मातेला आपल्याला एवढीं पोरें झालीं पण त्यांना खायला कसें मिळेल आणि तीं कशीं जगतील ह्याची चिंता आहे. तुमच्या पत्नीला असाध्य रोगानें जर्जर केलें म्हणून दुःख करतां पण बाहेरच्या मैदानांत तापलेल्या उन्हाचे चटके सोसत कितीतरी अनाथ मुलें उघड्यावर पडलीं आहेत तीं कशीं तुम्हांला दिसत नाहींत?

पण मच्छिन्द्रनाथ असें बोलत नसत. ज्याचें त्याचें दुःख ऐकावें आणि सांत्वन करावें हा त्यांचा बाणा. आई आपल्या साऱ्याच मुलांचीं दुःखें ऐकते, साऱ्यांवर मायेचें पांघरूण घालते, साऱ्यांच्याच हितासाठीं जपते.

वरुणदेव साऱ्यांनाच पाणी देतो. सूर्य साऱ्यांनाच किरण देतो. चंद्राचें चांदणें साऱ्यांना शीतल करतें. फुलें साऱ्यांना सुगंध देतात. निसर्गाजवळ आपपर भेद नाहीं. देवाजवळ हा आपला नि तो परका असा भाव नाहीं. मग देवाच्या भक्ताजवळ तरी हा भेद कां असावा? साधूनेंच हा भेद कां बाळगावा? सारींच देवाचीं लेकरें, साऱ्यांचीच चिंता त्याला लागलेली. तीच गोष्ट साधुसंतांची. त्यांनीं आकाशाएवढें विशाल व्हायला हवें. धरित्रीइतकें सोशिक व्हायला हवें. चंद्राची शीतलता त्यांच्यांतही हवी. सूर्यासारखाच त्यांनीं साऱ्यांना प्रकाश द्यायला हवा. फुलांप्रमाणें साऱ्यांनाच सुगंध वांटीत राहावें आणि चंदनाप्रमाणें साऱ्यांसाठीं झिजावें. तरच तो खरा साधु!

म्हणूनच मच्छिन्द्रनाथ आईच्या ममतेनें साऱ्यांच्या दुःखांची विचारपूस करीत. साऱ्यांच्या जखमांवर मायेचा हात फिरवीत. साऱ्यांचें मधुर वाणीनें

सांत्वन करीत. त्यांच्याजवळ सर्वांना प्रवेश होता. त्यांच्या हृदयाचा दरवाजा सर्वांना उघडा होता. आणि त्यांच्या महालाचे दरवाजेही दिवसा-रात्रीं उघडे होते. कुणींही केव्हांही यावें, मच्छिन्द्रनाथ त्याची विचारपूस करायला सदा तत्पर.

पण रात्रीं कोण येणार? निद्रेची झापड डोळ्यांवर पडली, काळोखाचें पांघरूण घेऊन सारें जग दडलें म्हणजे मग बहुधा कुणी येत नसत. मग अशा वेळीं मच्छिन्द्रनाथ आपल्या व्याघ्रासनावर मांडी घालून बसत आणि समाधि लावीत. जणुं निद्रित मुलांबाळांवर मायेचें पांघरूण घालण्यासाठीं हा योगी असा जागृत राहात असे.

अशीच एक रात्र. काळोखाच्या पांघरुणाआड दडलेली काळीकुट्ट रात्र. जिकडे तिकडे अंधाराचें आणि निद्रेचें साम्राज्य. राजरस्त्यावर काय आणि राजमहालांत काय, सारीकडे सामसूम.

पण अशा वेळीं राजरस्त्यावर ही चोरटी चाहूल कुणाची? दबकत दबकत आणि इकडेतिकडे पाहात चाललेले हे कोण? मध्येंच 'खुट्ट' आवाज झाला तरी बावरणारे आणि उभे राहून कानोसा घेणारे! ओहो, हे तर चोर दिसतात. कुठें चालले आहेत हे? ह्यांचीं पावलें राजवाड्याकडे वळलेलीं दिसतात! पण ते बघा पुन्हा मागें वळले. त्यांना काय बरें दिसलें? बागेच्या कोपऱ्यांतल्या महालांतला तो प्रकाश! हा प्रकाश झिरपल्यासारखा नव्हता येत. स्वच्छ चांदण्यासारखा बरसणारा प्रकाश. त्यांनीं समोर पाहिलें आणि त्यांना आश्चर्य वाटलें.

महालाचा दरवाजा सताड उघडा होता! त्या दरवाजांतून हे प्रकाश-किरण बाहेर येत होते. अंधाराला उजळूं पाहात होते.

चोरांना आश्चर्य वाटलें. अशा भलत्या वेळीं दरवाजे उघडे कसे? जवळ येऊन पाहातात तों काय, खिडक्यासुद्धा उघड्या! कुणी आपलेच भाईबंद येथें येऊन चोरी करून गेले कीं काय? पण हें काय? दरवाजावर पहारासुद्धा नाहीं?

आश्चर्यानें ते चोर एकमेकांकडे पाहूं लागले. त्यांना काय कल्पना कीं इथें राहाणाऱ्या माणसाच्या महालांतच नव्हे तर हृदयांतसुद्धा साऱ्यांना प्रवेश होता.

आंत येऊन पाहातात तों सारीकडे धुपाचा सुवास दरवळलेला. फुलांच्या माळा जिकडे तिकडे लावलेल्या. चौरंगावर पक्वान्नांचीं, मेवांमिठाईचीं आणि फळांचीं ताटें आणि तीं देखील सोन्यारुप्याचीं! पलीकडे सोन्याचीं नीरांजनें, रुप्याच्या मोठ्या दोन समया तेवत असलेल्या.

हें सारें वैभव पाहून चोरांचे डोळे दिपल्यासारखे झाले. आपण राजाच्या महालांत आहोंत कीं देवाच्या मंदिरांत आहोंत हें त्यांना कळेना. मूर्ति पाहावी तों कुठेंच नाहीं. गाभारासुद्धा नाहीं. मग ही सारी पूजा कुणाची? हा सारा थाटमाट कशासाठीं? हा रुप्याचा ढीग चौरंगावर उधळल्यासारखा पडलेला आहे हा कुणासाठीं? हीं रुप्याचीं ताटें, सोन्याचीं नीरांजनें, हे भरजरी वस्त्रांचे पडदे. हीं इथें उघड्यावर कां मांडलेलीं? ही कोणत्या देवाची आराधना!

देवाची थाटामाटानें उघड्यावर पडलेली पूजा त्यांनीं कधीं पाहिली नव्हती. रुप्याच्या अंबारींतून मिरविणारे आणि सोन्याचांदीचीं फुलें उधळलीं जाणारे श्रीमंतांचे देव त्यांनीं पाहिले होते. पण ते नेहमीं कडीकुलपांत अडकलेले. संगिनीच्या पहाऱ्यांत बसलेले.

त्यांनीं इकडे तिकडे पाहिलें. दारांत पहारेकरी लोळत पडलेले. आंत नोकरचाकर निजलेले. कुणाच्या हातांत पंखा तर कुणाच्या हातांत मोर्चेलें.

इतक्यांत त्यांच्यापैकीं एकाचा पाय कशावर तरी पडला आणि आवाज झाला 'खण्'. दचकून पाहातात तों काय, टाळ! जवळच एक मृदंग आणि एक वीणा....कुणा नर्तिकेचें नृत्य तर नव्हतें ना होत? कुणा गायिकेच्या संगीताचा जलसा तर नव्हता ना चाललेला? कुणा सुंदरीच्या नृत्य-गायनाचा का हा सारा समारंभ! तिच्यासाठीं का हा सारा

खटाटोप ! हीं सोन्यारुप्यांचीं फुलें आणि हीं ताटें ! काय माणसें असतात पाहा ! सुंदर तरुण स्त्रियांना भाळतात आणि त्यांच्यावर काय वाटेल तें उधळतात ! पण आपल्याला असा विचार कशाला हवा ? बरेंच झालें. आपण बिचारीला झालेलें द्रव्याचें ओझें थोडें कमी करूं. नाहींतरी रस्त्यानें कुणीतरी लुटणारच.

पण हें काय ? इथें बाईमाणूस तर कुणीच दिसत नाहीं. इथें पलंगपोस नाहींत, मृदु शय्या नाहीं, मच्छरदाण्या नाहींत. फक्त हीं नीरांजनें तेवत आहेत, प्रकाश पुरवीत आहेत.

इतक्यांत एकाची दृष्टि पलीकडे अंधारांतल्या एका कोपऱ्याकडे गेली. तेथें एका विस्तीर्ण व्याघ्राजिनावर एक तरुण, देखणा, जटाधारी पुरुष बसलेला होता. क्षणभर त्यांना वाटलें जणुं तो आपल्याकडे पाहात आहे. पण छे ! त्याचे डोळे मिटलेले, हात जोडलेले. समाधिस्थ बसल्याप्रमाणें त्याची मुद्रा होती.

ह्या महात्म्याचीच ही मठी होती कीं काय ? हीं सोन्यारुप्यांचीं फुलें काय ह्याच्यावर उधळलेलीं ? पण असें असलें म्हणून काय झालें ? साधूंना काय करायचें एवढें द्रव्य ? त्यांना कशाला हवा एवढा थाटमाट !

तें कांहीं नाहीं. दैवानेंच आज आपल्याला इथें आणलें म्हणायचें. आतां आपलें काम केलें पाहिजे. आपलें काम द्रव्याशीं. चला, हा डोळे उघडील त्याच्या आधींच हें सारें घेऊन पसार होऊं या.

तीं नीरांजनें अद्याप तेवत होतीं, तो धूप अद्याप दरवळत होता.

एक चोर जरा दचकला. तो म्हणाला, " नको रे बाबा ! मला तर इथें आल्यापासून कसंसंच वाटतंय्. आपण भलत्या ठिकाणीं आलों. "

" म्हणून काय, हात हलवीत परत जायचं ? "

" मला तर इथें कोणत्याही वस्तूला हात लावावंसं वाटत नाहीं. भीति वाटते. "

"छेः भीति कसली? चल हो पुढें, लाग वेचायला. तूं हीं मेवामिठाईचीं ताटं उचल, मी हें पूजाद्रव्य गोळा करतों."

असें बोलत दुसऱ्या चोरानें पूजेचीं उपकरणीं उचलायला सुरुवात केली. पण पहिला उभाच!

"अहा रे नेभळ्या! विचार कसला करतोस?"

"नाहीं रे बाब्रा. मला नाहीं हें काम करावंसं वाटत."

"अरे, तुझीं पोरं बाळं उपाशीं आहेत ना? तीं काय म्हणतील? त्यांना काय खाऊं घालशील?"

"मला वाटतं, ही मेवामिठाई तेवढी न्यावी. ताटं राहूं द्यावींत तशींच."

"खुळा रे खुळा! असली मिठाई आपल्या दरिद्री कपड्यांत भरून नेणार?"

"कां कोण जाणे, मला ह्या प्रकाशाची भीति वाटते."

"तुला अंधारांत कामं करायची सवय. म्हणून तसं वाटतं."

"अरे हा राजमहाल खरा. पण साधासुधा खास नव्हे. कसली तरी जादू आहे इथें. ही पाहा समई. हें नीरांजन. अद्याप कसं तेवत आहे. प्रकाश देत आहे. ह्या प्रकाशांत हें काम करायला कसंसंच वाटतं."

"सोपी युक्ति! आपण हा प्रकाशच विझवून टाकूं, म्हणजे झालं."

"नको. नको."

"तूं मुलखाचा भित्रा. बघ मी हें करतों. पाहूं काय होतं तें."

असें म्हणत दुसऱ्या चोरानें समईजवळ जाऊन फुंकर मारली.

तेवढ्यांत एकदम मोठा जाळ झाल्यासारखा झाला आणि दुसऱ्याच क्षणीं ....

"हें काय, माझ्या डोळ्यांत काय गेलं?" तो म्हणाला.

"कुठें काय? पाहूं."

"मला तर कुठेंच कांहीं दिसत नाहीं. खूप अंधार झाला, नाहीं?"



तेवढ्यांत एकदम मोठा जाळ झाल्यासारखा झाला आणि दुसऱ्याच क्षणीं...

" छेः अंधार कुठला ? ही समई तर अद्याप कशी तेवत आहे."

" म्हणतोस काय ? समई विझली नाहीं ? मग हें झालं काय ? मला कशी दिसत नाहीं ?"

" काय म्हणतोस ? दिसत नाहीं ?"

" छेः कांहींसुद्धा नाहीं !"

पहिल्या चोरानें जवळ जाऊन पाहिलें तों काय, खरंच त्याच्या सोबत्याची दृष्टि गेलेली. डोळे उघडे असूनही त्याला दिसत नव्हतें. आंधळ्यासारखा तो चाचपडत होता.

" मीं म्हटलं नव्हतं, इथें कांहींतरी जादू आहे म्हणून !"

" बरं. राहूं दे तें सारं. आतां इथून केव्हां जातों असं मला झालंय्. कुणीं पकडलं तर मोठी पंचाईत व्हायची."

" बरं चल." म्हणून दुसऱ्यानें त्याचा हात धरला आणि तो पुढें पाऊल टाकणार तोंच कुणीं तरी त्याचें पाऊल बांधल्यासारखें केलें. तो एकदम अडखळला. जमिनीला खिळल्यासारखा झाला.

सोबत्यानें विचारलें, " काय रे, एकदम थांबलास ?"

" अरे, काय सांगूं ? घात झाला ! मोठा घात !"

" म्हणजे काय ?" आंधळ्यानें घाबरून विचारलें.

" अरे, माझे पाय जमिनीला खिळल्यासारखे झालेत. मुळीं उचलत नाहींत."

" काय म्हणतोस ? देवा ! देवा ! काय झालं हें."

" अरे ! केवढ्यानें ओरडतोस. गप्प राहा कसा. आतां माझ्या लक्षांत आली सारी गोष्ट..."

" कोणती गोष्ट ?"

" अरे, ही सारी ह्या समाधिस्थ पुरुषाची जादू. हा इथें व्याघ्रासनावर बसला आहे ना, हा कुणीतरी सिद्ध पुरुष असावा. नाहींतर एरवीं इतक्या

निर्भयपणानें दरवाजा उघडा ठेवून ध्यानस्थ बसण्याची कुणाची छाती होती? साधुपुरुष तो. त्याला कशाची भीति! त्याला कोण उपद्रव देणार! जो देईल तो असा फजीत पावेल."

व.५३३

"मग आपण काय करायचं?"

"दुसरं काय करायचं? थांबायचं. ह्या महात्म्याची समाधि उतरली कीं आधीं त्याच्या पायां पडून क्षमा मागायची."

मग ते दोघे चोर तसेच उभे राहिले. मनांतून ते खूपच भ्याले होते. ह्या महात्म्याची समाधि उतरते केव्हां आणि आपण त्याच्या पायां पडतों केव्हां, असें त्यांना झालें होतें. त्यांना भीति वाटत होती ती एवढीच कीं ह्या महापुरुषाऐवजीं दुसऱ्या कोणाची झोप उडाली आणि जर का कोणीं आपल्याला पाहिलें तर ... तर काय ... आपलीं पुरीं शंभर वर्षें भरलींच म्हणायचीं. आपल्याला राजापुढें पकडून नेण्यांत येईल. आपल्या तोंडाला काळोखी फासली जाईल. गाढवावर बसवून साऱ्या नगरांत आपली धिंड काढली जाईल आणि मग आपल्या नातेवाइकांना, बायकापोरांना कसें लाजल्यासारखें होईल. काय म्हणतील आपलीं मुलेंबाळें? काय म्हणतील आपले नातेवाईक? छे: ! करायला गेलों एक आणि झालें भलतेंच. धर्म करतां कर्म उभें राहावें तशांतलीच गत झाली.

असा विचार करीत ते दोघे तसेच उभे राहिले. बिचारे करतात काय?

पंचपंच उष:काळची वेळ झाली तेव्हां मच्छिन्द्रनाथांची समाधि उतरली. 'हरहर', 'शिवशिव', 'ॐ नमः शिवाय' असा मंत्राचा जप करीत त्यांनीं डोळे उघडले.

समोर पाहातात तों दोन पुरुष उभे. भव्य शरीराचे, धिप्पाड बांध्याचे.

त्यांनीं विचारलें, "कोण तुम्ही, असे उभे कां?"

त्यांतला एक पुरुष हात जोडून रडत रडत म्हणाला, "महाराज, आमच्याच तोंडानें आमचीं दुष्कृत्यं कशीं सांगावीं! आम्ही आलों होतों वाईट हेतूनें. दरवाजा उघडा दिसला म्हणून आंत शिरलों."

" साधूच्या घराचा दरवाजा नेहमींच उघडा असतो. "

" पण आम्ही पडलों पापी. आम्हांला हें कुठलं कळायला? आम्ही आंत आलों आणि हें सारं द्रव्य पाहून आमची मति भुलली. माझ्या ह्या सोबत्यानें सारीं उपकरणीं गोळा केलीं. "

" मग घेऊन कां नाहीं गेलांत? तुमच्या उपयोगी तरी पडलीं असतीं तीं. "

" नाहीं महाराज. आम्हांला कसला त्यांचा उपयोग! आम्ही का देवाची पूजा करणार होतों! तीं विकायचीं नि पैसा मिळवायचा एवढाच आमचा हेतु. "

" मग तुम्हांला कुणीं अडवलं नाहीं ना? "

" नाहीं. कोण्या माणसानें अडवलं नाहीं. आपल्या पुण्यप्रतापानेंच अडवलं. "

तितक्यांत दुसरा पुरुष रडत म्हणाला, " महाराज, आपलं सामर्थ्य आम्हीं ओळखलं नाहीं. आम्हांला क्षमा असावी. "

" तुम्ही कोण? क्षमा मागण्याजोगता अपराध तरी काय घडला? "

" महाराज " पहिला म्हणाला, " हा माझा सोबती. ह्याची दृष्टि गेली आहे, महाराज! "

" अरेरे! दृष्टि जायला काय झालं? "

" आपण सर्वज्ञ. आपल्याला काय सांगायचं? प्रकाशाची मला भीति वाटली म्हणून हा फुंकर मारायला गेला. "

" प्रकाशाची भीति? छे: भीति बाळगावी अंधाराची. भीति बाळगावी दुष्कर्माची. तुम्ही कांहीं दुष्कर्म करीत नव्हतां ना? "

" त्या दुष्कर्माचीच भीति होती, महाराज. आपल्या पुण्याईचा प्रकाश आम्हांला भिववीत होता. "

आंधळा रडत म्हणाला, " महाराज, दया करा. माझे डोळे परत येतील असं करा. "

" बरं ! बरं ! घाबरूं नका, जा. तुम्हांला कसली इजा होणार नाहीं. कुणाची भीति बाळगायची आवश्यकता नाहीं. जा, पण लपतछपत नका जाऊं. चांगले हसतखेळत जा. " असें म्हणून त्या दोघांच्याही मस्तकावर मच्छिन्द्रनाथांनीं हात ठेवला.

" महाराजांच्या कृपेनें माझी दृष्टि परत मिळाली. " आंधळा म्हणाला.

" आणि माझेही जमिनीनें गिळलेले पाय मला परत मिळाले. " दोघांनाही आनंद झाला. दोघांनींही मच्छिन्द्रनाथांच्या चरणांवर मस्तक ठेवलें.

" महाराज, जातों आम्ही. आमच्यावर कृपा असूं द्या. "

" अरे ! असे रिकाम्या हातानें नका जाऊं. बायकापोरांना काय सांगाल ? आल्यासारखं कांहीं घेऊन जा. "

" नका महाराज. मोहांत नका गुंतवूं. आपली कृपा असूं द्या म्हणजे झालं. "

" माझी कसली कृपा ! सारी कृपा देवाची. त्याची आठवण ठेवा. देवाला लाज वाटेल असं कर्म करूं नका म्हणजे झालं. "

बोलतां बोलतां मच्छिन्द्रनाथांनीं त्यांच्या हातांवर प्रसादाचे द्रोण ठेवले, फुलें दिलीं आणि मग निरोप दिला.

चोर घरीं आले आणि बायकापोरांना प्रसाद वाटूं लागले तों काय, हातांतलीं फुलें सोन्याचीं झालीं होतीं. प्रसादाच्या द्रोणांनाही सुवर्णाची कळा !

तेव्हांपासून त्या दोघा चोरांनीं चोरी सोडली आणि ते मच्छिन्द्रनाथांचे शिष्य बनले.

******************************************

# ७ ★ ★ जहाज वांचविलें

ह्या संसारांत कधीं सुख तर कधीं दुःख, कधीं छाया तर कधीं प्रकाश, कुठें ऊन्ह तर कुठें पाऊस, असा खेळ चालू असतो.

पण परमेश्वराला तरी असा खेळ कां खेळावासा वाटतो? लोकांना पीडा व्हावी असं कां त्याला वाटतं? जनावरें भुकेनें तडफडावींत, लहान मुलें 'अन्न' 'अन्न' करीत मरावींत, गांवेंच्या गांवें भुकेच्या वणव्यांत पेटल्यागत जळून खाक व्हावींत, अशी कां त्याची इच्छा असते?

नाहीं. परमेश्वराचा हा खेळ कांहीं निराळ्याच हेतूनें चाललेला असतो. त्याला पाहायचें असतें मानव्य. त्याला हवी असते माणुसकी. अशा अग्निदिव्यांत माणसाच्या अंगची माणुसकी काय करूं शकते हें त्याला पाहायचें असतें. प्रेम आणि सहानुभूति ह्यांवर तर परमेश्वराची दुनिया आधारलेली असते. सत्तावीस नक्षत्रांतून पावसाळ्याचीं नऊ नक्षत्रें वजा केलीं तर हातांत काय राहील? शून्यच ना? दया हा वर्षाऋतूचा धर्म आहे. धरित्रीचा जीवनहेतुही तोच आणि माणुसकीही त्यांतच आहे.

एकाच्या डोळ्यांत पाणी आलें तर दुसऱ्याचा कंठ रुद्ध व्हावा, एकाच्या पायाला कांटा बोचला तर दुसऱ्याच्या तोंडांतून 'हाय हाय' निघावें, एकाला जखम झाली तर दुसऱ्याच्या हृदयाचें पाणी पाणी व्हावें हीच खरी माणुसकी; हाच खरा मानवाचा धर्म. हा धर्म मानव कितपत आचरतो, त्याच्या वागणुकींत कितपत उतरतो, हेंच परमेश्वराला पाहायचें असतें.

आणि ह्या माणुसकीचें खरें मोल केव्हां कळतें? आपत्तीच्या झंझावातांत, विपत्तीच्या प्रलयांत, संकटाचे मेघ गरजूं लागले म्हणजे माणुसकीची परीक्षा होते. अडचणीच्या आगींत जें भाजूनपोळूनही कायम राहातें तें खरें सुवर्ण. तीं खरी माणुसकी. अशी परीक्षा परमेश्वरालाही कधींकधीं घ्यावीशी वाटते.

मच्छिन्द्रनाथ अयोध्येंत असतांना अयोध्यानगरीला अशीच कठोर अग्निपरीक्षा द्यावी लागली.

जणुं ही परीक्षा पाहाण्यासाठीं परमेश्वरानें आपले एकाहून एक पराक्रमी दूत पृथ्वीवर पाठविले. एरवीं प्रकाश देणारा, किल्मिष जाळणारा ' सहस्रकर ' सूर्य आतां बाराही डोळ्यांनीं पृथ्वीला जाळूं लागला. साऱ्या जमिनी तापल्या. नदीनाले सुकले. विहिरी कोरड्या पडल्या. पानें सुकलीं. वृक्षसुद्धा शुष्क झाले.

मग आला वारा! त्यानें अवखळपणा सुरू केला. कधीं पाहिला नव्हता असा सोसाट्याचा प्रचंड वारा. पानें गिरक्या घेऊं लागलीं. वृक्ष कडाडूं लागले. उन्मळून पडूं लागले. पालापाचोळासुद्धा उडून गेला. त्यांतच अग्निदेवानें भर घातली. जंगलें पेटलीं. सारें गवत व वृक्ष जळाले, भस्मसात् झाले. कडाड् काड् आवाज करीत ठिणग्या आकाशांत हजारो कोस वर उडूं लागल्या. जनावरें पळूं लागलीं. पक्षी भिऊन सैरावैरा उडाले. माणसांचीही केवढी धांदल. जंगलालगतच्या गांवांनाही आगीचा प्रसाद मिळाला. कुठें कांहीं झालें तर कुठें कांहीं. कुठें झोपड्या जळाल्या तर कुठें गवताच्या गंजी भस्मसात् झाल्या. काड् कडाड् करीत झाडें पडूं लागलीं आणि त्यांखालीं कुठें जनावरांचा तर कुठें माणसांचा चेंदामेंदा झाल्याच्या वार्ता ऐकूं येऊं लागल्या. साऱ्या पंचमहाभूतांनीं प्रळय मांडला. सारीं माणसें भेदरलीं. सारी अयोध्या भीतिग्रस्त झाली.

हा आला मेघराज. लोकांना हायसें वाटलें. त्यांच्या मनांत आलें "चला, ठीक झालं. आतां पाऊसकाळ सुरू होईल आणि ही सारी दैना थांबेल." पण तसें व्हायचें नव्हतें. मेघराज आले ते प्रलयकाळच्या रुद्राप्रमाणें थयथय नाचत आले. त्यांचें तें भीषण तांडवनृत्य कांहीं केल्या थांबेना. डोंगरांतून नाले सैरावैरा खळाळ् खळ् करीत धावत आले. काय ते पाण्याचे लोट! जणुं जमिनीला गिळायला काळपुरुषानें उघडलेला अजस्त्र जबडाच. नदीला पूर आला. किनाऱ्यालगतचीं घरें वाळूसारखीं ढासळलीं.

जणुं कधीं नव्हे तो करभार घ्यायला नद्या आतुर झाल्या होत्या. त्यांची भूक शमेना. पूर ओसरेना. उलट पाणी वाढूं लागलें. घों घों करीत वर येऊं लागलें. साऱ्यांचें धाबें दणाणलें. राजरस्त्यांतून गुडघा गुडघा पाणी. नावा सोडलेल्या. घरें पाण्यांत अर्धीं बुडालेलीं. मुलें माणसें चिंताक्रान्त झालेलीं.... आणि मग विजेचा प्रलयंकर नाच सुरू आणि पाण्याचा मुसळधार वर्षावही सुरू. अनावृष्टि पत्करली पण ही अतिवृष्टि नको असें वाटूं लागलें. लोक आकाशाकडे पाहून विनवूं लागले, " मेघराजा, कृपा कर आणि हा वर्षाव थांबव. "

पण मेघराजानें विकट हास्य केलें आणि तो चालता झाला. मात्र तो एकटा गेला नाहीं. त्यानें घरें धुवून नेलीं. पीक वाहून नेलें. शेतांतलें पीक नेलें आणि कोठडींतला दाणाही धुवून नेला. वर्षावर्षाचीं गांवांतलीं दाणागोट्यानें भरलेलीं कोठारें धुवून साफ झालीं होतीं. त्यानें ठेवलें फक्त पाणी. पाण्यानें भरलेलीं शेतें, पाण्यानें भरलेले रस्ते. पाण्यानें भरलेलीं घरें.

दुष्काळ ! दुष्काळ ! कुठून आला हा ? चिखलानें भरलेल्या शेतांतून वर आला कीं निर्मळ, स्वच्छ आकाशांतून खालीं कोसळला ? घरांत नाहीं दाणा, शेतांत नाहीं पीक. काय करावें ? काय खावें ? कसें जगावें ? थोरांचे चेहेरे चिंताक्रान्त दिसूं लागले. लहानांचीं तोंडें सुकलेलीं दिसूं लागलीं. पशुपक्षी तडफडत मरूं लागले. माणसें अन्नासाठीं सैरावैरा दाहीदिशा पळूं लागलीं. अर्धपोटीं माणसें, पोट पाठीशीं लागलेलीं माणसें, " दे माय गोळाभर तरी अन्न दे. " म्हणून भुकेनें विव्हळणारीं माणसें, रडणारीं माणसें ! रस्त्यारस्त्यावर, घरादारांत, बाजारांत जिकडेतिकडे अन्नासाठीं ओरड आणि आक्रोश. कुठें चोऱ्या तर कुठें दरोडा, कुठें मारामारी तर कुठें लुटालूट ! आणि हें सारें गोळाभर अन्नासाठीं.

ह्या अयोध्या नगरींत चंदनदास नांवाचा एक वाणी राहात होता. फार श्रीमंत होता. सुगंधी वस्तूंचा आणि अत्तरांचा व्यापार करणारा एक वाणी. राजरस्त्यावर बाजारपेठेंत त्याचें मोठें दुकान होतें. त्या दुकानावरून

गेलें म्हणजे सुगंधाचें जणुं भोजन मिळे. दुकानांत जाऊन पाहावें तों हरतऱ्हेच्या सुवासांनीं इंद्रियें तृप्त होत, मन भरून जाई. काय तें वैभव, तो थाटमाट आणि ती सारी रोषणाई. दुकानांत लोक येत तेही सामान्य नसत. मोठे श्रीमंत, धनिक आणि रसिक लोक. व्यापाऱ्यांची, सावकारांची, सरदारांची, राजेरजवाड्यांची तेथें दाटी होई. दूरदूरच्या द्वीपांतले लोकही येत. चंदनदासाचा व्यापार खूप चाले. रोज हजारों रुपयांची उलाढाल. मालाची देवघेव आणि नेआण सारखी चालू. नोकरचाकर तरी किती. पण चंदनदास स्वतः दुकानांत बसे. स्वतः जातीनें सारीकडे लक्ष घाली. दूरदेशीं जाऊन मालाची नेआण आणि देवघेवही करी. दर वर्षीं सुवर्णद्वीपांत त्याची खेप ठरलेली.

त्याच्या दुकानांत काय नसे? सर्व तऱ्हेचीं सुगंधी द्रव्यें, निरनिराळ्या वासांचीं फुलांपासून तयार केलेलीं देशोदेशींचीं अत्तरें, सुवासिक धूप, अगरबत्ती, सुंदर मृगाजिनें, रेशमीं वस्त्रें आणि कमावलेलीं सुबक कातडीं, सारें तेथें मिळे.

चंदनदास हें त्याचें नांव सार्थ होतें. खरोखरीच चंदन! नांवाप्रमाणेंच चंदन! त्याच्या दुकानांतच काय ती सुगंधाची लयलूट होती असें नाहीं. त्याच्या सहवासांतही हीच मौज, हाच आनंद. इतका उदार आणि प्रेमळ, इतका आनंदी आणि मनमोकळा, इतका रसिक आणि दिलदार प्राणी कुणीं कधीं पाहिला नसेल. चंदनाप्रमाणें सुगंध कसा द्यावा हें त्याला माहीत. चंदनाप्रमाणें झिजावें कसें हेंही तो जाणे.

चंदनदासाच्या औदार्याच्या आणि प्रेमळपणाच्या गोष्टी मच्छिन्द्रनाथांच्याही कानांवर गेल्या होत्या. मच्छिन्द्रनाथांना तें ऐकून फार बरें वाटे. गार वारा कोणाला नकोसा असतो? फुलें कोणाला आवडत नाहींत? त्यांतल्या त्यांत देवाला वाहिलेलीं फुलें सार्थकीं लागतात. सज्जनांना शिरोधार्य होतात. चंदनदासाचा सहवास मच्छिन्द्रनाथांनाही आवडे. ज्याला फुलें आहेत पण कांटे नाहींत असा वृक्ष पाहिला म्हणजे जसा आनंद वाटतो तसा

चंदनदासाला बघून मच्छिन्द्रनाथांना वाटे. आणि चंदनदास नम्र तरी किती! त्याची ती नम्रता, ती भक्ति, ती सेवा करण्याची आवड, तें सारें पाहिलें म्हणजे मच्छिन्द्रनाथ म्हणत, " चंदनदास! तुम्ही म्हणजे ह्या अयोध्येची शोभा! ह्या अयोध्येंतले कल्पतरु!"

चंदनदास नम्रतेनें अधिकच पायांशीं वाकत, लीन होत आणि म्हणत, " महाराज, कशाला हा उगाच गौरव करतां? अयोध्येंत हजारों माणसं अन्नापायीं तडफडून मरत आहेत आणि तरी आम्ही कांहीं करूं शकत नाहीं. काय करायची ही संपत्ति? काय करायचं हें जिणं?"

मच्छिन्द्रनाथ त्यांना शांत करीत आणि म्हणत, " होईल. तुमच्या मनासारखं होईल." कांहीं वेळानें हसून म्हणत, " हीच तर तुमची कसोटी आहे."

हळुहळू खरोखरच ती वेळ आली. आणीबाणीची वेळ. कसोटीची वेळ! अग्निदिव्य करण्याची वेळ!

अन्नासाठीं तडफडणारे लोक आतां काय वाटेल तें करूं लागले. त्यांना कशाची खंत नव्हती. ते खुशाल मारहाण करीत, लूटमार करीत. स्वतःच्या बायकोच्या गळ्यांतला मणि विकून भूक भागवूं लागले. कोणी बायकोला मारूं लागले. कोणी पोरांचा जीव घेऊं लागले. कोणीं आत्महत्या केल्या तर कोणीं गळे दाबून प्राण घेतले. कोणीं मुलें सोडून दिलीं तर कोणीं विकलीं. हळुहळू हें लोण राजधानीपर्यंत आलें. राजरस्त्यांवर दिसूं लागलें. दिवसाढवळ्या उघडउघड हल्ले होऊं लागले. प्राणघातक हल्ले. आज अमक्याचें दुकान लूट, उद्यां दुसऱ्याच्या कोठीवर जाऊन हल्ला कर, तर परवां तिसऱ्याच्या घरांत शिरून बायकामुलांच्या अंगावरील दागिने चोर, असे प्रसंग होऊं लागले. त्या बातम्या ऐकल्या आणि श्रीमंतांचीं धाबीं दणाणलीं. तोंडें सुकलीं. दुकानदारांनीं आपल्या दुकानांना टाळीं लावलीं. कोणीं आपल्या वाड्यावर सशस्त्र पहारेकरी ठेवले. पण हे सारे उपाय दोन दिवसांचे. पुढें काय करायचें?

पण स्वतः चंदनदासाला हे उपाय पटले नाहींत. तो म्हणे, ह्या उपायांनीं भागणार नाहीं. ह्यामुळें चोरी वाढेल. कारण आज जे चोरी करीत आहेत ते खरे चोर नव्हत. परिस्थितीनें पांगळे झालेले, धर्माधर्माचा विवेक नाहींसा झालेले हे मूर्ख लोक! ह्यांच्यावर दयाच केली पाहिजे. ह्यांच्यासाठीं अन्नछत्रें उघडलीं पाहिजेत. तोच खरा उपाय. पण हा उपाय त्या श्रीमंतांना. मानवेना. स्वतःच्या मुलांबाळांना मारून दुसऱ्यांचे जीव वांचवायचे? आपल्या स्वतःपुरतें राहिलेलं अन्न ह्या भटाभिक्षुकांना द्यायचें? आणि मग आपण काय खायचें?

ह्या प्रश्नाला चंदनदास तरी काय उत्तर देणार! तो स्तब्ध राहिला. जें करतां येईल तें करीत राहिला आणि जें होईल तें पाहात राहिला.

पण उदार मनाच्या चंदनदासाला कांहीं केल्या स्तब्ध बसावेंसें वाटेना. दर दिवसाला चाललेला तो अनर्थाचा प्रळय कसा थांबवावा ह्याची त्याला चिंता वाटूं लागली. अन्नासाठीं गल्लीगल्लींत, घराघरांत चाललेला तो आक्रोश, रस्त्यारस्त्यांतील ती गर्दी आणि ती हाणामार त्याला बघवेना. आज अमक्या पोरानें घरदार सोडून पळ काढला, आज तमक्याची पोरगी कुठें दिसेनाशी झाली, आज अमक्याच्या बायकोनें विहिरींत जीव दिला, तमकीनें पोटच्या पोराच्या गळ्याला नख लावलें, अमक्यानें स्वतःचीं बायकापोरें विकायला काढलीं, तर तमक्यानें गांजून जाऊन स्वतःच्याच गळ्याला फास लावून घेतला, अशा त्या साऱ्या गोष्टी! त्या गोष्टी त्याला ऐकवेनात, पाहावेनात आणि त्यासाठीं काय करावें हेंही सुचेना.

अशा अवस्थेंत तो असतांनाच एक दिवस सकाळींच त्याच्या कानांवर वार्ता आली कीं राजरस्त्यावरील त्याच्या दुकानावर लोकांनीं हल्ला केला आहे आणि राजपुरुष त्यांना झोडपून काढीत आहेत. तें ऐकतांच चंदनदासाला राहवलें नाहीं. नोकराचाकरांनीं खूप सांगितलें कीं तुम्ही जाऊं नका. लोक फार क्षुब्ध झाले आहेत. काय करतील ह्याचा नेम नाहीं. तरीपण चंदनदास गेला. कशासाठीं? दुकानाची नासधूस थांबविण्यासाठीं?

नाहीं. लोकांचा मार वांचविण्यासाठीं. चंदनदासानें मनाशीं वेगळाच विचार केला होता. आज सकाळीं उठतांच त्यानें मनाशीं ठरविलें होतें कीं आपल्या दुकानाचीं दारें लोकांसाठीं उघडीं ठेवायचीं. लोकांना हवा तो माल घेऊं द्यायचा. विचाऱ्यांना अन्न देतां येत नाहीं तर पैसा तरी द्यावा. ह्या नाहीं त्या उपायानें लोकांची दैना थांबवावी हाच चंदनदासाचा हेतु.

पण चंदनदास जाऊन पाहातो तों त्याला निराळेंच दृश्य दिसलें. लोकांचा थवा दुकानांत शिरत होता. शस्त्रधारी लोक त्यांना अडवीत होते, तरीही कांहीं लोक आंत घुसले होते. कांहींनीं दुकानाला आग लावली आणि दुकानांतलें सारें सामान ते त्या आगींत टाकून जाळूं लागले.

विचाऱ्या चंदनदासाला तें दृश्य पाहवलें नाहीं. तो ओरडून म्हणूं लागला, “ ही नासधूस थांबवा. तुम्हांला हवं तें घेऊन जा. पण वस्तु जाळतां कां ? नष्ट कां करतां ? ”

पण लोक ऐकेनात. त्यांच्या पोटांतला भुकेचा अग्नि ह्या आगीहून प्रज्ज्वलित होता. ह्या आगींत नुसतें घर जळत होतें. नुसत्या वस्तुच नष्ट होत होत्या पण त्या भुकेच्या आगींत तर सारे सद्विचार जळून खाक झाले होते.

ते ओरडून म्हणाले, “ आम्हांला काय करायच्या ह्या वस्तु ? ज्या वस्तु विकूनसुद्धा पोट भरतां येत नाहीं, त्यांचं करायचं काय ? आम्हांला अन्न हवं अन्न ! ”

आणि अशा रीतीनें दुकानाची नासधूस करून ते लोक निघून गेले.

अर्धें दुकान आगीनें जळलेलें, किंमती वस्तु नष्टप्राय झालेल्या, सुगंधी द्रव्याचा लोट जमिनीवर सांडलेला, बाटल्या फुटलेल्या, केशर-कस्तुरींचा सडा पडलेला, मृगाजिनांचीं आणि रेशमी वस्त्रांचीं फाटून लक्तरें झालेलीं.

तें पाहून चंदनदासाच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. त्याच्या मनांत आलें, ह्या भुकेल्या माणसांना आपल्या दुकानांतून कांहींसुद्धा घेऊन जातां येऊं नये ना! त्यांची भूक शमेल असा एकही पदार्थ ह्या दुकानांत मिळूं नये ना! व्यर्थ आहे हा माल, ह्या साऱ्या वस्तु. ज्यांच्यामुळें माणसाची दुपारची भूक शांत होत नाहीं त्यांची किंमत तरी काय? त्या वस्तु असून नसल्या तरी सारख्याच. व्यर्थ आपण एवढ्या वस्तु जमविल्या. एवढं दुकान थाटलं. पण ह्या साऱ्या डामडौलाच्या वस्तु. केवळ शोभेच्या वस्तु. ह्या गरिबांना खरोखरच त्यांचा काय उपयोग होता? त्यांनीं देहाला नटवितां येईल, सजवितां येईल, शोभिवंत करतां येईल पण पोटांतली आग नाहीं शांत करतां येणार! व्यर्थ आपलें हें दुकान कीं जेथें येऊनही लोकांची भूक भागली नाहीं. व्यर्थ हें आपलें वैभव कीं ज्यानें लोकांना पुरेसें पोटाला देतां आलें नाहीं.

साऱ्या नगरांत वर्तमान गेलें कीं चंदनदासाचें दुकान लुटलें गेलें, जाळलें. तेव्हां सारे लोक धावत आले. राजा आला. मच्छिन्द्रनाथही आले.

मच्छिन्द्रनाथांना पाहातांच चंदनदासाचा गळा दाटून आला. त्याला रडूं आलें.

मच्छिन्द्रनाथ म्हणाले, "चंदनदासजी, असं काय करतां? लहान मुलासारखे रडतां कां? अहो, अशा गोष्टी व्हायच्याच. धन हें नश्वर आहे. तें कधीं तरी नष्ट व्हायचंच."

"नाहीं. महाराज, मी गेल्या गोष्टीसाठीं रडत नाहीं. दुकानाची नासधूस झाली ह्याचं मला इतकं वाईट वाटत नाहीं. उलट माझ्या एवढ्या दुकानांत येऊनही विचारे गरीब लोक उपाशीं गेले, ह्याचं मला वाईट वाटतं. व्यर्थ आहेत ह्या वस्तु, ज्यांनीं लोकांचं-गोरगरिबांचं पोट भरूं शकत नाहीं, त्यांना गोळाभर अन्न मिळूं शकत नाहीं. महाराज, व्यर्थ आमचं धन! व्यर्थ आमची श्रीमंती! ह्या विचारानें मला रडूं येतं."

मच्छिन्द्रनाथ हसले आणि म्हणाले, " धन्य धन्य तुमची चंदनदास. असल्या तुमच्यासारख्या विचारी आणि विवेकी माणसांकडूनच जगाच्या कल्याणाची आशा असते. "

" पण महाराज, ती निव्वळ आशा काय कामाची! मला कांहीं उपाय सांगा. काय करूं तें सांगा. "

" चंदनदासजी, एक उपाय आहेसं वाटतं. पाहा, तुम्हांला करतां येतो का ! "

" सांगा महाराज. "

" तुमचा बाहेरच्या द्वीपांशीं मोठा व्यापार आहे म्हणून ऐकतों. तुमच्याजवळ नौका आहेत आणि नावाडीही आहेत, होय ना ? "

" होय महाराज. "

" मग बाहेरच्या द्वीपांत जाऊन तुम्हांला ह्या गोरगरिबांसाठीं कांहीं धान्य नाहीं का आणतां येणार? आतांच हा विचार मीं राजांना बोलून दाखविला. तेही हवा तितका पैसा खर्च करायला तयार आहेत. पण जाणार कोण आणि आणणार कोण? बोला, तुम्ही जातां का ? "

" जातां का म्हणून काय विचारतां? ' जा ' म्हणून आज्ञा द्या. महाराज, खरंच, किती छान हा उपाय! आम्हांला कसा नाहीं सुचला? तुम्ही देवासारखे आमच्या मदतीला धावून आलां. अशीच आमच्यावर कृपा ठेवा. "

" बरं मग तुम्ही कुणाला पाठवतां ? "

" पाठवायचं कशाला? मी स्वतःच जातों. असलीं कामं नोकरा-चाकरांकडून नीट व्हायचीं नाहींत. मीच जातों. आपल्या आशीर्वादानें बाहेरगांवीं माझ्या थोड्याफार ओळखी आहेत. त्यांचाही कदाचित् झाला तर उपयोग होईल. "

चंदनदासाचें म्हणणें मच्छिन्द्रनाथांना पटलें. ते म्हणाले, " ठीक आहे. चंदनदासजी, आपण जाल तर फारच चांगलं. "

मग चंदनदासानें प्रयाणाची सिद्धता केली. शुभ मुहूर्त पाहिला. मच्छिन्द्रनाथांचा आशीर्वाद घेतला. बायकामुलांचा निरोप घेतला आणि सुवर्णद्वीपाला जायला निघाला.

त्या काळीं सुवर्णद्वीप व्यापाराचें एक मोठें केंद्र होतें. मोठमोठे श्रीमंत व्यापारी तेथें जात. तऱ्हेतऱ्हेच्या सुबक, सुंदर, मौल्यवान् वस्तु विकत घेत. सुवर्णद्वीपांत मिळणार नाहीं अशी वस्तु त्या काळच्या जगांत नव्हती. चंदनदासाचाही सुवर्णद्वीपाशीं मोठा व्यापार होता. देवघेव होती. त्यामुळें तेथल्या मोठमोठ्या धनिकांशीं त्याची चांगली ओळख होती. कुणाकुणाशीं तर घनिष्ठ मैत्री होती.

सुवर्णद्वीपचे प्रमुख व्यापारी धनशेटी चंदनदासाचे मित्र होते. धनशेटींनीं चंदनदासाचें खूप स्वागत केलें. पुष्कळ दिवसांनीं स्वतः चंदनदास त्यांच्या भेटीला आले होते. मग कां नाहीं त्यांना आनंद होणार? ते म्हणाले, " चंदनदासजी, बऱ्याच दिवसांनीं भेटताहांत. आतां आम्ही तुम्हांला लवकर नाहीं जाऊं देणार." चंदनदासांनीं उत्तर दिलें, " तुमच्या प्रेमानें तर मला नेहमींच बांधून ठेवलं आहे. घरीं असलों तरी हजार वेळां तुमची आठवण होते. तुमच्या ह्या प्रेमानेंच मला इथें आणलं."

" हं. हें झालं नुसतं बोलणं. गोड गोड बोलणं. खरी गोष्ट कांहीं वेगळीच असली पाहिजे. त्याशिवाय तुम्ही स्वतः यायचे नाहीं. खरं ना?"

चंदनदास हसले व म्हणाले, " माणसाच्या अंतरंगांत शिरण्याची कला तुमच्याजवळ आहे तर!"

" ह्यांत कसली कला. तुमची चर्याच तसं सांगते. माणसाची चर्या सर्व कांहीं सांगते म्हणतात तें खोटं नाहीं. न बोलतां न पुसतां सांगते. तुमचं मन ह्या वेळीं प्रसन्न दिसत नाहीं हें तर खरं ना?"

" खरं बोललांत. शेठजी, ह्या वेळीं खरंच मन प्रसन्न नाहीं. मन प्रसन्न कसं असणार? अयोध्या नगरींत भुकेचा डोंब उसळला आहे. माणसं

मरताहेत, बायका जीव देताहेत. मुलंबाळं डोळ्यांत प्राण आणून अन्नाची वाट पाहात आहेत, पण त्यांना द्यायला गोळाभर अन्नसुद्धा नाहीं."

"अरेरे, फारच वाईट दशा ही. मग अगोदरच कां नाहीं आलांत? केव्हांच तुमची व्यवस्था करून दिली असती. सुवर्णद्वीपांत ह्या वर्षी खूप पीक आलं आहे. देवाच्या दयेनें भरपूर पीक आहे. आजवर आम्हीं कधीं धान्याचा व्यापार केला नाहीं. बाहेरदेशीं पाठवलं नाहीं. पण ह्या वेळीं तुम्ही आलांत आणि अशी वाईट दशा झाल्याचं सांगितलंत, तेव्हां कांहींतरी मदत केलीच पाहिजे. आपण महाराजांना भेटूं. अधिकारीही आपल्या ओळखीचे आहेत. पुष्कळसे शेठसावकारही आपले मित्र आहेत. सारे आपल्याला मदत करतील. मी तर आपल्या सेवेंत आहेंच."

"होय. म्हणून तर मुद्दाम आपणाकडे आलों. ह्या वेळीं मला रत्नं नकोत कीं सुगंधी अत्तरं नकोत. मला हवं आहे धान्य. पैसे लागतील तेवढे देऊं पण धान्य मिळवून द्या. एवढी मदत आम्हांला करा. आम्ही आपले उपकार विसरणार नाहीं."

"ह्यांत उपकार कसले! मनुष्यमात्रानें एकमेकाला मदत केलीच पाहिजे. एकमेकाला जगवलं पाहिजे."

जसे चंदनदास तसेच धनशेटी. दोघेही उदार, दोघेही प्रेमळ. धनशेटी वचनाचे सच्चे. त्यांनीं चंदनदासांना म्हटल्याप्रमाणें खरोखरच सारी व्यवस्था केली. त्यांनीं सुवर्णद्वीपच्या महाराजांच्या कानांवर गोष्ट घातली आणि बाहेरदेशीं धान्य पाठविण्याबद्दल राजाज्ञा घेतली. मोठमोठ्या अधिकाऱ्यांना भेटले. शेठसावकारांच्याही गांठीभेटी घेतल्या. साऱ्यांची अनुकूलता घेतली. स्वत:चीं माणसें खेड्यापाड्यांत पाठविलीं. मोठमोठ्या धनिकांना चिठ्या लिहिल्या. स्वत: चंदनदासाबरोबर मोठमोठ्या दुकानांत हिंडून धान्य विकत घेण्यास मदत केली. सर्वांना धनशेटी सांगत, "ही आपली परीक्षा आहे. ही आपल्या माणुसकीची कसोटी आहे. ही आपल्या सुवर्णद्वीपाची सत्त्वपरीक्षा आहे. ह्या वेळीं मागेंपुढें पाहूं नका. हा अन्नयज्ञ आहे. हें अन्नदान

आहे. भुकेल्यांच्या पोटांत हें अन्न जाईल तेव्हां ते तुम्हांला आशीर्वाद देतील. त्या दरिद्रीनारायणाचे पांग फेडा. नारायण तुमचे पांग फेडील."

धनशेटींच्या प्रयत्नानें अल्पावकाशांत लाखों पोतीं धान्य गोळा झालें. मग चंदनदासांनीं जायचा विचार केला. धनशेटी म्हणाले, "आणखी थोडे दिवस थांबा. खूप धान्य मिळेल."

चंदनदास म्हणाले, "नको. आतां मला जाऊं द्या. आहे तेवढं धान्य तर नेऊं द्या. त्यांच्या पोटांत अन्नाचा कण केव्हां जाईल असं मला झालं आहे. हवं तर पुन्हा येईन."

धनशेटींना नाहीं म्हणतां येईना. हजारों जीवांच्या प्राणांचा प्रश्न होता. ते म्हणाले, "ठीक आहे. मुहूर्त पाहून जा."

चंदनदास म्हणाले, "मुहूर्ताची काय आवश्यकता! सत्कार्याचा संकल्प हाच शुभ मुहूर्त. जितक्या लवकर जाईन तितकं बरं. लाखों लोकांचे प्राण वांचतील. त्यांच्या तोंडांत, अन्नाचा दाणा पडेल. ते चातकासारखे वाट पाहात असतील. पाहातां पाहातां दोन महिने व्हायला आले. आतां गेलं पाहिजे."

मग प्रयाणाची सिद्धता झाली. नावांमध्यें धान्याचीं पोतीं भरलीं. शिडें उभारलीं. जहाजें निघालीं. समुद्राच्या मंद मंद लाटा त्यांना बोलावीत होत्या. त्या लाटांवर डुलतडुलत तीं निघालीं. हसतहसत निघालीं. साऱ्यांचेंच लक्ष घरांकडे लागलेलें. बायकापोरांची भेट होईल, साऱ्यांना पोटभर खायला मिळेल ह्या आनंदांत सारीं होतीं. चंदनदासांनाही केवढा आनंद! लाखों लोकांच्या पोटांत आतां अन्न जाईल. चातकासारखे सारे आपल्या येण्याकडे लक्ष लावून बसले असतील. त्यांची भूक निवेल. अंतरात्मा शांत होईल. सारी प्रजा आनंदी होईल. केवढा हा कृतार्थतेचा आनंद! ह्या आनंदाला मोल नाहीं.

पण हें काय? हा कसला वारा? छे, छे, शिडांना मदत करणारा वारा हा नव्हे. हा तर उलट त्यांना बहकविणारा वारा. जहाजांचा मार्ग

अडविणारा वारा. जहाजांना भलत्या दिशेनें नेणारा वारा. ही तर अशुभाची खूण ! सारे नावाडी मनांतल्या मनांत भ्याले. एकमेकांकडे पाहूं लागले. साऱ्यांच्या मनांत काळजी सुरू झाली. हा वादळी वारा त्यांच्या चांगला ओळखीचा. जहाजें उलटविणारा, नावाड्यांचा प्राण घेणारा, सारें ' समुद्रास्तृप्यन्तु ' करूं पाहाणारा अवखळ आणि क्रूर वारा.

सारे भ्याले. सारे चिंतातुर झाले. त्यांचें अवसान गळूं लागलें. धैर्य खचूं लागलें. काळजी पोटांत घर करूं लागली. साऱ्यांच्या दृष्टीला एकच गोष्ट दिसूं लागली. मरण ! स्वतःचें मरण ! मरणाहून भयप्रद गोष्ट दुसरी कोणती ? सारे हवालदील झाले. आतां आपलें कसें होणार ? घरीं सुखरूप जाणार का ? बायकापोरांची भेट होणार का ? काय आहे आपल्या नशिबांत ? शेठजींनीं घाई केली. शुभ मुहूर्त पाहिला नाहीं. त्याचं तर नव्हे ना हें फळ ? समुद्रदेवता कोपली तर नाहीं ना ?

त्यांच्या चर्येवरील हे विचार चंदनदासांनीं ओळखले. त्यांनीं त्यांना धीर दिला. समाधान केलें. देव आपला पाठीराखा आहे, भिऊं नका, असें सांगितलें; पण वाऱ्यावादळाचा जोर अनावर होऊं लागला. समुद्राच्या लाटा नावांवर येऊन आदळूं लागल्या. नावांत पाणी शिरूं लागलें. नावाड्यांचा जोर चालेना. एवढ्या क्षुब्ध झालेल्या समुद्रापुढें विचारे जीव काय करूं शकणार ? त्यांचें बळ कुठवर टिकणार ? असे चार दिवस गेले. चौथी रात्र तर फारच भयंकर गेली. प्रलयाचें जणुं तुफान माजलें. लाटा उंच उंच उठूं लागल्या. नावा हेलकावे खाऊं लागल्या. नावांतून पाणी खेळूं लागलें. साऱ्या नावा डळमळ डळमळ करूं लागल्या.

चंदनदासही हतबुद्ध झाले. मनांतल्या मनांत ते देवाची प्रार्थना करूं लागले, " देवा वरुणराजा, आम्हीं काय पाप केलं म्हणून असा कोपलास ? ह्या बिचाऱ्या नावाड्यांनीं तुझा काय अपराध केला ? ह्या नावा बुडवून तुला तरी काय मिळणार ? तूं तर पडलास रत्नाकर. हजारों रत्नं माणकं आजवर गिळलींस, जीवजंतु गिळलेस. आतां हें धान्य देखील गिळून

टाकणार आहेस कीं काय? हजारों लोकांच्या पोटांत अन्नाचा कण नाहीं. तो जाऊं नये अशी का तुझी इच्छा आहे?

"गुरुदेवा, मच्छिन्द्रनाथा! तुम्ही तरी दया करा. सत्कार्य करणारा माणूस, देवाचं आवडतं कार्य करणारा माणूस, तुम्हा साधुसंतांनाही आवडतो ना? तुम्ही त्याची रक्षा करतां ना? मग आज दया करा. आपल्या दयेची प्रचीति येऊं द्या. ह्या वरुणदेवतेचा कोप शांत करा. सत्कार्यासाठीं प्राण वेंचावे तसेच कधीं कधीं ते रक्षावे हाही तुमचाच धर्म! हजारों अयोध्यावासी जनांची तुम्हांला कींव आली तशीच ह्या चार नाविकांचीही कींव करा."

डोळे मिटून चंदनदास मच्छिन्द्रनाथांची मनांतल्या मनांत प्रार्थना करीत होते तोंच आवाज आला, "चंदनदासजी!"

चंदनदासांनीं डोळे उघडून पाहिलें तों काय, सुकाणू हातांत घेऊन मच्छिन्द्रनाथ नौकेंत उभे.

"महाराज, अशा भलत्या वेळीं कसे आलांत?"

"तुम्ही बोलावलंत म्हणून आलों. आतां घाबरूं नका. सारं सुरळीत होईल."

चंदनदासांनीं समोर पाहिलें तों काय, आभाळांत कोवळीं किरणें फेकीत सूर्य वर येत होता. वारा थांबला होता. तुफान स्तब्ध झालें होतें. जणुं तुफान आलेंच नव्हतें; वादळ झालेंच नव्हतें.

"महाराज, केवढी ही आपली दया." म्हणून चंदनदासांनीं मच्छिन्द्रनाथांच्या पायांवर लोटांगण घातलें आणि चरणांवर मस्तक ठेवणार तोंच...

पाहातां पाहातां मच्छिन्द्रनाथ अदृश्य झाले. आले कुठून आणि गेले कुठें कांहीं कळलें नाहीं. सारे एकमेकांकडे आश्चर्यानें पाहूं लागले. साऱ्यांना कळलें कीं मच्छिन्द्रनाथांनीं कृपा केली. चंदनदासांचें हृदय दाटून



" तुम्ही बोलावलंत म्हणून आलों. आतां घाबरूं नका ... "

आलें. केवढी ही कृपा! सत्कार्यासाठीं प्राण वेचणाऱ्यांचे प्राण रक्षावेत ही साधुसंतांचीच योजना.

वारा वाहूं लागला. जहाजाचीं शिडें फडफड करूं लागलीं. पाण्याच्या लाटांवर पुन्हा एकदा डौलदारपणें नृत्य करीत नौका निघाल्या. नावाड्यांचीं हृदयें हर्षभरित झालीं. हृदयांत हर्ष, डोळ्यांत आशा.

आणि ह्याच वेळीं अयोध्येच्या राजवाड्यांत पाहाल तर निराळेंच दृश्य. जिकडे पाहावें तिकडे हृदयांत हुरहूर आणि डोळ्यांत चिंता!

राणीच्या प्रसूतीची वेळ जवळ आली होती. सुईणीची धांदल आणि राणीच्या वेदना. नोकर-चाकरांची धावपळ आणि राजाच्या हृदयाला यातना. नव्या अपत्याला जन्म देतांना माता मृत्यूच्या खाईतून चालली होती. एकाचा जन्म आणि दुसऱ्याचें मरण जणुं एकाच क्षणीं व्हावें असा निष्ठुर खेळ खेळला जात होता.

राणीच्या त्या वेदना राजाला ऐकवेनात. मग पाहवणार कुठून? राजा आंवतींभोवतीं पाहूं लागला. माणूस संकटांत पडला, बावरला म्हणजे आजूबाजूला पाहूं लागतो. त्याला हवा असतो धीर. त्याला हवें असतें आश्वासन. त्याच्या बावरत्या हृदयाला कुणी सावरणारें हवें असतें. पण राजाला धीर कोण देणार? साऱ्यांच्या नजरा खालीं लागलेल्या. साऱ्यांच्या डोळ्यांत काळजी. वैद्यराज म्हणजे प्रति अश्विनीकुमार पण तेही भांबावून गेलेले.

राजाला मच्छिन्द्रनाथांची आठवण आली. कुठें आहेत म्हणून विचारलें तर कळलें कीं गुरुजी आपल्या मठींत केव्हांचे ध्यानस्थ बसले आहेत. मग राजा स्वतःच उठला आणि मच्छिन्द्रनाथांकडे गेला. पाहातो तों खरेंच गुरुदेव ध्यानस्थ बसलेले. समाधि लागलेली. नेत्र मिटलेले. ह्या योगीश्वराला कोण उठविणार? ह्या जागृताला कोण जागें करणार? सचिंत मुद्रेनें राजा तेथेंच उभा राहिला. गुरुजी आतां डोळे उघडतील, मग उघडतील अशा आशेनें तेथेंच वाट पाहात राहिला. आतुरता म्हणजे काय तें त्याला आज

कळलें. भीतीचा खरा अर्थ आज त्याच्या ध्यानांत आला. भयभीत मुद्रेनें आणि कासावीस अंत:करणानें लोक हात जोडून त्याच्यापुढें तत्परतेनें उभे असत. त्याच्या डोळ्यांकडे दीनवाण्या नजरेनें पाहात उभे असत. त्याचा एक कटाक्ष आपल्यावर पडला तरी त्यांना समाधान वाटे.

राजवाड्यांतून नोकरचाकर धावत आले. राणीचें दु:ख बघवेना. राजाला सांगावें, त्याला बोलावून न्यावें म्हणून आले. पण धन्याला त्या अवस्थेंत पाहून तेही जमिनीला खिळल्याप्रमाणें तेथेंच उभे राहिले. राणीला जाऊन तरी काय सांगायचें आणि राजाला निरोप तरी काय द्यायचा! साऱ्यांचें लक्ष मच्छिन्द्रनाथांकडे लागलें.

हळूहळू प्रहरानें मच्छिन्द्रनाथांचे ओठ हलतांना दिसूं लागले. 'शिवशिव', 'हरहर' असा मंत्र प्रथम अस्पष्ट आणि मागाहून स्पष्ट ऐकायला येऊं लागला. साऱ्यांच्या जिवांत जीव आला. राजालाही मध्येंच सुटलेली नाव परतीराला पोचावी तसें वाटलें. गुरुदेव उठले. आतां राणीच्या जिवाला धोका नाहीं म्हणून त्याचें मन कांहींसें संतोष पावलें.

मच्छिन्द्रनाथांनीं डोळे उघडले. त्यांच्या मुखावर प्रसन्नता होती. रणांगणावर शौर्य गाजवून कृतकार्य होऊन आलेला वीर, मृत्यूच्या दाढेंतून रोग्याला बाहेर काढणारा वैद्य, आपल्या रसदार फळांनीं साऱ्यांना तृप्त करून स्वत: तृप्तीचा आनंद पावलेला वृक्षराज, ह्यांना जसा आनंद होतो तसाच आनंद मच्छिन्द्रनाथांच्या मुखावर झळकत होता. पण शरीर थकल्यासारखें दिसत होतें. आणि हें काय, शरीरावरील वस्त्र तर पाण्यानें ठिबकत होतें. जणुं पाऊसपाण्यांतून जाऊन आल्याप्रमाणें अंग ओलें आणि वस्त्र अंगाला चिकटून बसलेलें. राजाला आश्चर्य वाटलें.

राजानें विचारलें, "महाराज, हें काय? एवढा घाम कशानें आला?"

"नाहीं रे बाबा. तो घाम नाहीं. समुद्राचं खारं पाणी हें." मच्छिन्द्रनाथ हसून म्हणाले.

"समुद्राचं पाणी नि इथें कसं?"

" चंदनदासानें बोलावलं होतं. मग नको जायला ? "

" चंदनदासावर कांहीं संकट का आलं होतं ? "

मच्छिन्द्रनाथ पुन्हा एकदा हसले पण पुढें बोलले नाहींत. तितक्यांत एका सेवकानें नम्रपणें पुढें होऊन म्हटलें, " राणीसाहेब बोलावताहेत. गुरुदेवांना घेऊन लवकर यावं अशी त्यांची प्रार्थना आहे. "

" राणीसाहेब बोलावताहेत ? कशासाठीं ? "

" प्रसूतीची वेळ आली म्हणून घाबरल्या आहेत. "

" मग हें प्रथमच सांगूं नये का ? चला जाऊं या. " म्हणून तातडीनें मच्छिन्द्रनाथ राजासह महालांत आले. मच्छिन्द्रनाथांना पाहातांच राणीनें रडत रडत म्हटलें, " गुरुदेव, हा मुलगा रडत नाहीं हो ! "

" एवढ्यासाठीं घाबरलांत ? रडेल, लवकरच रडेल. काय जगाचा न्याय पाहा ! तो रडला म्हणजे तुम्हांला बरं वाटेल, नाहीं का ? "

ओशाळल्याप्रमाणें राणी खालीं मान घालून म्हणाली, " तसं नाहीं. पण रडल्याशिवाय कसं हो कांहीं कळणार ! "

" बरं. बरं. तसं कां होईना. आतां रडेल हं. भिऊं नका. " असें म्हणत मच्छिन्द्रनाथांनीं जवळ जाऊन त्या अर्भकाच्या अंगावरून हात फिरविला आणि म्हटलें, " बेटा, आतां रडायला हवं. नाहींतर हे लोक रडायला लागतील. "

काय आश्चर्य ! त्याच क्षणीं बालकाचा क्रंदनध्वनि सुरू झाला. ट्यॉंहॉं ! ट्यॉंहॉं !

माता आनंदली. तिनें एकदम अर्भकाला जवळ घेतलें आणि छातीशीं कवटाळून धरलें. मृत्यूच्या जबड्यांतून परत आलेली ती माता आणि तें मूल ! तें सुखाचें दृश्य पाहून राजा प्रसन्न झाला. बारा दिवस राजधानींत आनंदाचा कल्लोळ उठला.

आणि ह्या आनंदाला आणखी बहर यावा अशी ईश्वराची इच्छा होती कीं काय कोण जाणे ! कारण ह्याच वेळीं वार्ता आली कीं चंदनदासजी



" बेटा, आतां रडायला हवं. नाहीतर हे लोक रडायला लागतील. "

आले! धान्याच्या गोण्या घेऊन आले. अयोध्येच्या प्रजेला पुरेल असें खंडो-गणती धान्य घेऊन आले. लोकांचीं मुखें प्रफुल्लित झालीं. घरोघरीं आनंद. दारोदारीं गुढ्या तोरणें.

साऱ्या अयोध्येंत जणुं सोन्याचा दिवस उगवला!

—व. ६३३

## ८ ☆ ★ आईचा आशीर्वाद

मच्छिन्द्रनाथ त्या रात्रीं नित्याप्रमाणें समाधिसुखाचा आस्वाद घेण्यासाठीं आपल्या व्याघ्राजिनावर बसले. डोळे मिटले. श्वास कोंडला. इंद्रियांचे सारे दरवाजे बंद झाले. अनाहताचा ध्वनि ऐकण्यासाठीं योग्यांचा राजा जणुं आतुर झाला होता. साऱ्या इंद्रियांपासून मिळणारीं सुखें, जगापासून मिळणारे उपभोग, राजमहालांतून मिरविणारें ऐश्वर्य, हें सारें ह्या समाधि-सुखापुढें तुच्छ होतें. असला अपूर्व सुखाचा लाभ केवळ योग्यांनाच मिळतो.

पण आज कां कोण जाणे, समाधि लागेना. स्थूलाकडून सूक्ष्माकडे नेहमीं धाव घेणारें मन आज कुठेंतरी अडकून पडलें होतें. मनाच्या अंतर्भागांत खोल कुठेंतरी सूक्ष्म हुरहूर बोचत होती. ह्या हुरहुरीनें एक नवेंच चित्र मच्छिन्द्रनाथांच्या डोळ्यांपुढें उभें केलें.

कोणतें तें चित्र! तें होतें एका दुःखी कष्टी मातेचें. पुत्र असूनही नसल्यासारखा झालेल्या एका अभागिनीचें. पोटांतली ममता ओठांवर खेळत असलेली, गात्रागात्रांतली व्यथा नेत्रांत चमकूं लागलेली, वृद्धापकाळानें क्षीण झालेली आणि अंतराळाकडे टक लावून बसलेली एक माता. ती माता मच्छिन्द्रनाथांना विचारीत होती, "लाडक्या! तूं कुठें आहेस? तूं केव्हां येणार? किती दिवस मला असा वाट पाहायला लावणार?"

त्या विचारानें मच्छिन्द्रनाथांचें मन अस्वस्थ झालें. मनांतली हुरहूर अधिक वाढली. आईच्या भेटीसाठीं जीव आतुर झाला.

खरेंच ! आईला सोडून किती दिवस झाले ! दुनियेवर प्रेमाचा वर्षाव करण्याच्या भरांत आईविषयींचें कर्तव्य आपण विसरलों. आपण गेल्यापासून आई कशी आपल्या येण्याकडे डोळे लावून बसली असेल ! तहानभुकेची तिला शुद्ध नसेल. तिला शुद्ध फक्त आपल्या प्रेमाची. तिला ओढ काय ती आपल्या लेकराची. आपण मात्र तिला विसरलों . . .

मच्छिन्द्रनाथांनीं निश्चय केला कीं आपण आतां निघायचें ! आईच्या भेटीला जायचें !

पण कमळाच्या पाकळ्यांत गुंतून पडलेला भ्रमर इतक्या सहजासहजीं कधीं सुटका पावतो काय ? लोककल्याणाच्या इच्छेनें विश्वाच्या संसाराचा मांड घालून बसलेल्या त्या जगद्धितेच्छु प्रेमळ गुरुमाउलीला तिचीं लेकरें अशीं सुखासुखीं सोडणार होतीं काय ? हजारोंच्या हजार इच्छा आणि हजारों संकल्प. त्या पुरवणें त्यांचें कर्तव्यच नव्हतें काय ? साऱ्या विश्वाला व्यापून बसलेला जगन्नायक भगवान् देखील मायेच्या प्रेमानें बांधण्यापुरता दशांगुळें उरला आणि ' दामोदर ' बनला !

तीच अवस्था मच्छिन्द्रनाथांची झाली. त्यांनीं जायचें ठरविलें. खरें पण अयोध्येच्या लोकांनीं त्यांना सोडलें पाहिजे ना ! दावें तोडल्याशिवाय किंवा सोडल्याशिवाय का वासरूं मोकळें होऊं शकतें ? आज कुणाच्या घरीं भजन तर कुणाच्या घरीं भोजन, कुठें सत्यनारायण तर कुठें व्रतउद्यापन, कुठें बारसं तर कुठें वनभोजन, आणि हें सारें मच्छिन्द्रनाथांसाठींच ना !

पण शेवटीं मच्छिन्द्रनाथांच्या लक्षांत आलें कीं ह्या मायाजालांत गुंतून उपयोगी नाहीं.

मग त्यांनीं एक दिवस ठरविलें कीं उद्यां येथून निघायचें.

मच्छिन्द्रनाथांनीं दुसऱ्या दिवशीं साऱ्यांचा निरोप घेतला. निरोप दिला गेला दु:खी अंत:करणानें आणि घेतला गेला तोही तितक्याच जड मनानें.

मच्छिन्द्रनाथांची माता म्हणजे जगन्माताच. साऱ्यांनीं निरोप सांगितला, " आईला नमस्कार सांगा. " राजा म्हणाला, " आईला घेऊन या. " राणी म्हणाली, " आईला म्हणा, आमच्याकडून सेवा घ्यायला इथें या. "

मच्छिन्द्रनाथ निघाले. आईच्या भेटीला धावत निघाले. मन तर केव्हांच वायुवेगानें पळालें होतें. पण देहाला म्हणाल तर पर्वतांचे कडे, नदीनाले आणि जंगलें ओलांडून जावीं लागत होतीं. कुठें निबिड घनदाट जाळीं तर कुठें वणव्याची आग. कुठें दिवसासुद्धा घनदाट अंधार तर कुठें रखरखीत वाळवंट. पण मच्छिन्द्रनाथांचें लक्ष तिकडे नव्हतें.

होतांहोतां एक दिवस ते आपल्या मुक्कामाजवळ आले. हेंच त्यांचें जन्मग्राम. हीच ती गांवची नदी, वेड्यावाकड्या वळणानें जवळच्याच समुद्राला मिळालेली. हेंच तें वाळवंट, जिथें सारीं मुलें खेळत. येथेंच ते मासे उन्हांत तगमगतांना बाळ मच्छिन्द्रानें पाहिले होते. बाप रागावला होता. पण बापाचा राग तरी मच्छिन्द्राच्या कल्याणासाठींच नव्हता का ? बाप रागावला म्हणूनच ना मच्छिन्द्र घराबाहेर पडले आणि त्यांनीं तप केलें ? जगाच्या कल्याणाची किल्ली म्हणूनच ना त्यांना सापडली. होय ! आतां बाबा भेटले तर त्यांना सांगितलें पाहिजे कीं आतांतरी माझ्यावर रागावूं नका. बाबांचें अंतःकरण दिसायला कठोर पण आंतून मृदु. आपण रागावून गेलों तर त्यांना खचित तळमळ लागली असेल. ते आपलें दुःख गिळतील, आंतल्या आंत लपवतील, एवढेंच. पण हिमालयाप्रमाणें वरवर कठोर दिसणाऱ्या त्यांच्याही हृदयांतून गंगोत्रीचे पाझर लपलेले आहेत.

बापाला भेटण्याच्या उत्कंठेनें मच्छिन्द्रनाथांनीं नदी ओलांडली आणि मधल्या जवळच्या वाटेनें गांवाचा रस्ता धरला. मधून मधून आंवतींभोवतीं पाहात. कुणी ओळखीचें दिसतें का ? कुणी बालमित्र भेटतो का, तें पाहात चालले. गांवाच्या साऱ्या खुणा कायम होत्या पण चेहेरे बदलले होते, तर कांहीं दिसेनासे झाले होते. कुठें घरें पडलेलीं तर कुठें झोपड्या बांधलेल्या.

रस्त्यानें जातां जातां एका म्हाताऱ्या कोळ्यानें त्यांना पाहिलें. मच्छिन्द्रनाथांनीं त्याला ओळखलें. बापाच्या बरोबरीनें समुद्रांत मासे पकडायला जायचा. त्यांचा मित्र. त्यांचा बालपणापासूनचा सवंगडी. भीमासारखा सशक्त आणि दांडगा म्हणून त्याला मुलें भीत. लोक त्याला 'भीमकाका' म्हणत. पण तें चिडवणें नव्हतें. तें होतें त्याच्या अचाट शक्तीचें कौतुक! पण भीमकाका आतां पुरता जख्खड दिसत होता. केस पांढरे झालेले आणि एरवीं दोरखंडासारखें दिसणारें शरीर आतां सुकलेलें. एखादा भक्कम हाडाचा सापळा पाहावा तसें दिसत होतें.

म्हाताऱ्यानें मच्छिन्द्रनाथांना ओळखलें नाहीं. ओळखणार कुठून? मच्छिन्द्रनाथांच्या मस्तकावरील तो जटाभार, तो विरक्त वेष, तें भस्मचर्चित शरीर, तो मस्तकावरील त्रिपुण्ड्र, तें सारें अगदीं नवीन. अगदीं वेगळें. म्हाताऱ्याला वाटलें, कुणी जोगीच आपल्या गांवांत भिक्षा मागायला आला. म्हणून त्यानें हात जोडून प्रणाम केला आणि पायांशीं वाकणार तोंच मच्छिन्द्रनाथांनीं हसून पाय मागें घेतला आणि म्हटलें, "हें काय, काका, मला कसला नमस्कार करतां? अहो, मी मच्छिन्द्र नव्हे का? ओळखलं नाहींत का?"

म्हातारा क्षणभर आश्चर्याच्या दृष्टीनें पाहातच राहिला. त्याला वाचा फुटली नाहीं. विस्मयाच्या नव्या नेत्रांनीं मच्छिन्द्राचें हें नवें रूप तो पाहात होता. जुन्या रूपाची आठवण करीत होता.

कांहीं वेळानें त्याला वाचा आली. गद्गद स्वरांत त्यानें म्हटलें, "कोण? मच्छिन्द्र! किती रे वाढलास? किती वेगळाच दिसूं लागलास! नि साधु रे कां झालास? अशा तरुण वयांत का जोग घ्यायचा?"

मच्छिन्द्रनाथांनीं हसत हसत मान डोलावली. ह्यापेक्षां दुसरें काय करायचें? ह्या प्रश्नाचें उत्तर काय द्यायचें? ज्यांना जगांत कोणी राहिलें नाहीं किंवा कांहीं करायचें उरलें नाहीं त्यानें जोगी व्हावें अशी ह्या

जगाची कल्पना! तरुण वय म्हणजे त्यांच्या मतें सुखाचा काळ, चैन करण्याचें वय. त्या वयांत जोग कशाला घ्यायचा?

म्हणूनच मच्छिन्द्रांनीं उत्तर दिलें नाहीं. ते केवळ हसले.

एकदम म्हाताऱ्याला आठवण झाल्याप्रमाणें तो म्हणाला, "अरे! तुझी आई किती आठवण करते तुझी!"

"अन् बाबा!" शंकातुर आवाजानें मच्छिन्द्रनाथांनीं विचारलें.

"तुझा बाबा...." क्षणभर तो म्हातारा थांबला. जें बोलायचें नाहीं तें बोलतांना जीभ अडखळावी तसें त्याचें झालेलें दिसलें. बोलावें कीं बोलूं नये अशा शंकेनें क्षणभर तो बावरला. मच्छिन्द्रनाथांच्या दृष्टीकडे नुसता पाहातच राहिला.

"सांगा ना. बाबांचं काय सांगत होतां तुम्ही...."

"कसं सांगूं, मच्छिन्द्र! अरे, तुझे बाबा दर्यांत बुडून गेले. सागरानें गिळले. किती छान माणूस. साऱ्यांच्या उपयोगी पडायचा; साऱ्या कोळीवाड्याची विचारपूस करायचा. अडलेल्या माणसाच्या मदतीला रात्रींबेरात्रीं धावून जायचा. तुझं त्याला केवढं कौतुक! नेहमीं म्हणायचा, माझा मच्छिन्द्र मोठा कोवळा, मोठा हळुवार. आतां असता तर माझ्याही पुढें धावत गेला असता मदत करायला. मग मीं नको जायला?"

मच्छिन्द्रनाथांच्या डोळ्यांत अश्रु तरळले. त्यांनीं विचारलें, "पण बाबा समुद्रांत बुडाले कसे?"

"अरे, मोठी वाईट गोष्ट झाली बघ. समुद्राला तुफान आलं होतं. त्यांत आपल्या कोळीवाड्यांतलीं कांहीं तरुण माणसं सापडलीं. मच्छिमारीसाठीं गेले ते तिथेंच अडकले नि इकडे काय विचारतोस? त्यांच्या तरुण बायका रडायला लागल्या. आयांनीं तर दु:खानें लोळणच घेतली. त्यांचं सांत्वन कोण करणार आणि त्या वादळांत होडी घालणार तरी कोण? पण तुझ्या बापाला तें पाहवलं नाहीं. तो एकटाच निघाला.

तसा गडी मनाचा खंबीर आणि दिलदार. शरीरानेंही कणखर आणि पीळदार. पण काय ? वेळ आली होती ना ! ”

“ पुढें काय झालं ? ”

“ पुढें काय सांगायचं ! आम्हीं पुष्कळ सांगून पाहिलं, पण गडी निघाला. घातली होडी पाण्यांत आणि गेला शोधायला. गंमत अशी कीं सारे सापडले. किनाऱ्यापर्यंत कसेतरी आले. पण मग काय झालं कुणास ठाऊक. जोराची लाट आली कीं काय कोण जाणे पण होडी उलटली. तरुण गडी सारे किनाऱ्याशीं लागले पण तुझे बाबा मात्र आढळले नाहींत. पुष्कळ शोध केला पण व्यर्थ ! शेवटीं साऱ्यांची समजूत झाली कीं समुद्रानेंच त्यांना गिळलं. ”

आपल्या वडिलांची ती करुण कहाणी ऐकतां ऐकतां मच्छिन्द्रनाथांचे डोळे भरून आले. हृदय सद्गद झालें. त्यांच्या मनांत आलें, आपले बाबा किती थोर आणि त्यांचें मरण तरी किती थोर ! भाग्यवंतालाच असें मरण येतें. रणांगणावर लढतां लढतां पतन पावणाऱ्या शूराचें तें बलिदान ! लोककल्याणासाठीं जीवदान करणाऱ्या योगीश्वरांची ती महासमाधि ! सूर्यमंडळालाही भेदून कर्तव्याचा मार्ग शोधीत राहाणाऱ्या कर्मवीरांचा मार्ग तो हाच !

मग मच्छिन्द्रनाथ तेथें थांबले नाहींत. धावतच घराकडे निघाले. केव्हां एकदा आईला भेटतों असें त्यांना झालें होतें.

संध्याकाळची वेळ. गाई घराकडे परतत होत्या. पक्षिणी घरट्यांकडे धाव घेत होत्या. एक वृद्ध माता दाराशीं उभी राहून आपल्या मुलाची वाट पाहात होती. काठी टेकीत दूरवर नजर टाकीत ती बराच वेळ उभी राही. पण तिचा मुलगा अद्याप आला नव्हता. बऱ्याच दिवसांचा आला नव्हता. पण वेडी माता ! तिला वाटे, येईल. आज तरी तो येईल !

अशा विचारांत ती उभी असतांनाच आवाज आला, “ आई, भिक्षा ! ”

म्हातारीनें पाहिलें, एक तरुण जटाधारी मुलगा अंगणांत उभा. तिनें विचारलें, "कोण रे बाबा तूं! असा संध्याकाळचा आलास! भुकेला का आहेस? थांब हं." असें म्हणत ती आंत जायला निघाली.

तो तरुण जटाधारी हसत हसत म्हणाला, "आई, मला साधी भिक्षा नको. तुझ्या प्रेमाची भिक्षा हवी."

"बेटा, किती विचित्र मागणं हें तुझं! माझ्या राजा, तुला आईनें सोडलं म्हणून का इथें आलास. किती वेडी आई तुझी!"

"नाहीं आई. माझी आई वेडी नाहीं. मी तिचा मुलगाच वेडा आहें."

"मग जा तर. आधीं आपल्या आईला भेट. तिच्यावर रागावून का जोग घेतलास? असें करूं नये. जा. घरीं तुझी आई वाट पाहात असेल. माझा पण मुलगा असाच रागावून गेला. किती दिवसांपासून त्याची वाट पाहात आहें. भेटला तर सांग त्याला. म्हणावं, आईवर रागावूं नकोस. आई वाट पाहात आहे. लवकर ये."

मच्छिन्द्रनाथांचें हृदय पुरतें गद्गद झालें. त्यांनीं धावत पुढें होऊन आईला कडकडून मिठी मारली आणि म्हटलें, "आई, मी मच्छिन्द्र."

"माझ्या लाडक्या!" म्हणत आईनें त्याच्या गळ्याला घट्ट मिठी मारली आणि नेत्रांतल्या आसवांनीं त्याला न्हाऊं घातलें.

मायलेकरांच्या त्या भेटीचा आनंद काय वर्णावा!

पुष्कळ दिवसांनंतर त्या भेटलेल्या मायलेकरांच्या मधुर गप्पा आणि गोड गोष्टी काय सांगाव्यात? कधीं कधीं मात्र आईच्या डोळ्यांत पाणी येई व ती म्हणे, "बेटा, इतकी पुण्याई मिळवून आलास! तुझ्या वडिलांना हें पाहून किती धन्यता वाटली असती."

"आई! ते खरे कर्मवीर. कर्म करतां करतां गेले. त्यांच्याबद्दल वाईट वाटून घेऊं नकोस. ते स्वर्गाला, नव्हे परंधामाला गेले. अशींच माणसं परमेश्वराला प्रिय होतात."



‘आई, मी मच्छिन्द्र.’

असा एक महिना गेला.

एक दिवस मच्छिन्द्रनाथांच्या मांडीवर डोकें ठेवून आई निजली. सुखासमाधानाच्या गप्पा करीत निजली. मच्छिन्द्रानाथांनीं सांगितलेल्या त्या परोपकाराच्या गोष्टी ऐकून तिचा जीव सुखावला. डोळे भरून आले. हृदय गद्गद झालें. समाधानाच्या स्वरांत ती म्हणाली, " बेटा, तूं मोठा झालास. मी धन्य झालें. असाच जगाचं कल्याण करीत राहा. "

आणि बोलतां बोलतां आईनें डोळे मिटले.

दुसऱ्याच क्षणीं मच्छिन्द्रनाथांच्या लक्षांत आलें कीं दीप विझला. ज्योत मालवली. त्या चिमुकल्या झोपडींत अंधकार झाला. इतकीं वर्षे मुलाच्या भेटीच्या आशेनें जीव धरून बसलेला प्राणपक्षी पिंजरा तोडून बाहेर गेला होता. जीव शिवांत मिसळला.

इतकें सात्त्विक, शांत, समाधानाचें मरण मच्छिन्द्रनाथांनीं पाहिलें नव्हतें.

दोन रात्री गेल्या, तीन रात्री गेल्या.

मच्छिन्द्रनाथांना झोप नाहीं.

तसें पाहिलें तर त्यांना आतां कोणताच बंध उरला नव्हता. तरी पण आईच्या वत्सलतेची आठवण हृदयांत घर करून होती. आपल्या प्रेमळ आईसाठीं आपण कांहीं केलें नाहीं ही अकृतार्थतेची भावना बोचत होती. आई हसत हसत गेली, तृप्तीचा आनंद अनुभवीत गेली पण मच्छिन्द्रनाथांच्या हृदयांत अतृप्ति ठेवून गेली.

तिसऱ्या रात्रीं पहाटेच्या वेळीं त्यांना स्वप्न पडलें. पाहातात तों समोर गुरु दत्तात्रेय. ते म्हणत होते, " मच्छिन्द्र, हें दुःख कां ? तूं योग्यांचा ईश्वर, जगाच्या कल्याणाचें व्रत घेऊन बसलेला योगी. मनांत कसलं दुःख करतोस ? तुझी आई गेली म्हणून काय झालं ! तुझ्या हृदयांत वत्सलतेचा अमृतकुंभ ठेवून ती गेली ना ! तें अमृत जगाला दे. जगाचं कल्याण कर. जगाला

प्रेमळता शिकव. एकमेकांच्या उरांत शस्त्रं खुपसणाऱ्या आजच्या जगाला प्रेमळतेचा पाठ शिकव! ऊठ, मच्छिन्द्रनाथा, ऊठ."

मच्छिन्द्रनाथांनीं हात जोडले व म्हटलें, "आज्ञा प्रमाण! होय! आपल्या आज्ञेप्रमाणें वात्सल्याचे कुंभ जगाला वांटीन. कारुण्याचे मेघ जगावर वर्षवीन. हेंच आतां माझं कर्तव्य! ॐ तत्सत्!"

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८६८४
REF 3K-0007944